दैनिक

https://samarthrajyog.com/
E-Mail : dainiksamarthrajyogbeed@gmail.com

# समर्थ राजयोग

SAMARTH RAJYOG

वैभव विवेक स्वामी
संपादक

राजमान्य, राजशक्ती

No.LSB / Beed / RNP - 200 / 2024 - 2026.

बीडसह छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, हिंगोली, नांदेड, लातूर, धाराशिव या जिल्ह्यातून एकाच वेळी प्रकाशित होणारे एकमेव मराठवाडा स्तरीय विभागीय दैनिक...

बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी वर्ष - ६ वे अंक -३०७ गुरूवार दि.१६ जुलै २०२६ 98 22 62 85 21 आरएनआय -एमएएचएमएआर/२०२०/७९८०१ । किंमत ३ रु । पाने ४

Beed Daily Marathi Year-6th Issue-307 Thursday, Dt.16 July 2026 98 22 62 85 21 RNI - MAHMAR/2020/79801 Price 3 Rs. Pages 4

## वाढत्या डिझेल दरांचा परिणाम

# साध्या बसेसवरील १० टक्के तिकीटवाढ ३१ जुलैपर्यंत कायम; प्रवाशांना सहकार्याचे आवाहन

मुंबई /प्रतिनिधी

वाढत्या डिझेल दरांमुळे एसटी महामंडळाच्या आर्थिक स्थितीवर मोठा ताण पडत असल्याने, प्रशासनाने महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. साध्या बसगाड्यांसाठी लागू करण्यात आलेली १० टक्के तात्पुरती भाडेवाढ आता ३१ जुलै २०२६ पर्यंत कायम राहणार आहे. महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाने (एसटी) १५ जुलै २०२६ रोजी प्रसिद्ध केलेल्या एका परिपत्रकाद्वारे ही अधिकृत माहिती दिली असून, प्रवाशांनी या निर्णयास सहकार्य करावे असे आवाहनही प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.



डिझेल दरवाढीचा एसटीला फटका

ग्रामीण महाराष्ट्राची जीवनवाहिनी असलेल्या एसटी महामंडळाकडून दररोज लाखो प्रवाशांना परवडणारी आणि विश्वासार्ह सेवा उपलब्ध करून दिली जाते. मात्र, गेल्या काही कालावधीत डिझेलच्या दरात मोठी वाढ झाल्यामुळे महामंडळाच्या दैनंदिन इंधन खर्चात प्रचंड वाढ झाली आहे. याचा थेट परिणाम महामंडळाच्या आर्थिक स्थितीवर होत आहे. अशा कठीण परिस्थितीतही प्रवाशांना अखंडित आणि दर्जेदार सेवा देता यावी, यासाठी प्रशासनाने साध्या बसगाड्यांवरील ही परिवर्तनशील (हंगामी) भाडेवाढ कायम ठेवण्याचा निर्णय घेतला आहे.

उन्हाळी हंगामातील भाडेवाढीला मुदतवाढ

एसटी महामंडळाने यापूर्वी उन्हाळी गर्दीचा हंगाम लक्षात घेऊन, साध्या बसगाड्यांच्या भाड्यात तात्पुरती १० टक्के वाढ लागू केली होती. या भाडेवाढीची मुदत १५ जुलै २०२६ रोजी रात्री २४.०० वाजेपर्यंत (१२ वाजेपर्यंत) होती. तथापि, सध्याची वाढती प्रवासी संख्या, वाहतुकीची मोठी गरज आणि वाढलेला इंधन खर्च या सर्व बाबींचा गांभीर्याने विचार करून या भाडेवाढीस आता मुदतवाढ देण्यात आली आहे.

### ३१ जुलैपर्यंत १० टक्के जास्तीचे भाडे

महामंडळाच्या नव्या निर्णयानुसार, आता ३१ जुलै २०२६ रोजी रात्री २४.०० वाजेपर्यंत साध्या बससेवा प्रकारासाठी ही १० टक्के जास्तीची परिवर्तनशील भाडेवाढ लागू राहणार आहे. प्रवाशांना सुरक्षित, नियमित आणि दर्जेदार सेवा उपलब्ध करून देणे हे महामंडळाचे मुख्य उद्दिष्ट असून, वाढत्या इंधन खर्चाचा ताण काही प्रमाणावर कमी करण्यासाठीच हा निर्णय घेण्यात आल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.



महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ

मध्यवर्ती कार्यालय, महाराष्ट्र वाहतूक भवन, डॉ. आनंदराव नायर मार्ग, मुंबई सेंट्रल, मुंबई ४००००८ | ई-मेल - pro@msrtc.gov.in

जनसंपर्क शाखा

वाढत्या डिझेल दरांच्या पार्श्वभूमीवर एसटीचा निर्णय; साध्या बसगाड्यांवरील १० टक्के तात्पुरती भाडेवाढ ३१ जुलैपर्यंत कायम

मुंबई, दि. १५ जुलै २०२६ :
महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाने (एसटी) वाढत्या डिझेल दरांचा आर्थिक भार लक्षात घेऊन साध्या बससेवा प्रकारासाठी लागू असलेली १० टक्के परिवर्तनशील (हंगामी) भाडेवाढ ३१ जुलै २०२६ पर्यंत कायम ठेवण्याचा निर्णय घेतला आहे.

एसटी महामंडळ ग्रामीण महाराष्ट्राची जीवनवाहिनी म्हणून दररोज लाखो प्रवाशांना परवडणारी आणि विश्वासार्ह प्रवासी सेवा उपलब्ध करून देत आहे. मात्र, गेल्या काही कालावधीत डिझेलच्या दरात झालेल्या वाढीमुळे महामंडळाच्या दैनंदिन इंधन खर्चात मोठी वाढ झाली असून, त्याचा थेट परिणाम आर्थिक स्थितीवर होत आहे. अशा परिस्थितीत प्रवाशांना अखंडित आणि दर्जेदार सेवा देण्यासाठी परिवर्तनशील भाडेवाढीचा निर्णय कायम ठेवण्यात आला आहे.

महामंडळाने यापूर्वी उन्हाळी गर्दीचा हंगाम लक्षात घेऊन साध्या बसगाड्यांच्या भाड्यात तात्पुरती १० टक्के वाढ लागू केली होती. या भाडेवाढीची मुदत १५ जुलै २०२६ रोजी रात्री २४.०० वाजेपर्यंत होती. तथापि, वाढती प्रवासी संख्या, सध्याची वाहतूक गरज आणि वाढलेला इंधन खर्च विचारात घेऊन या भाडेवाढीस मुदतवाढ देण्याचे आली आहे.

त्यानुसार, ३१ जुलै २०२६ रोजी रात्री २४.०० वाजेपर्यंत साध्या बससेवा प्रकारासाठी १० टक्के परिवर्तनशील भाडेवाढ लागू राहणार आहे.

एसटी महामंडळाचे उद्दिष्ट प्रवाशांना सुरक्षित, नियमित आणि दर्जेदार सेवा उपलब्ध करून देणे हेच असून, वाढत्या इंधन खर्चाचा ताण काही प्रमाणात कमी करण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे. प्रवाशांनी या निर्णयास सहकार्य करावे, असे आवाहनही महामंडळाच्या वतीने करण्यात आले आहे.

(रोहन देसाई)
सहाय्यक जनसंपर्क अधिकारी

# अजित पवार यांची जयंती आता शासकीय स्तरावर साजरी होणार

## राज्य सरकारचा आदेश जारी

मुंबई / प्रतिनिधी

राज्य सरकारने दिवंगत नेते अजित पवार यांच्या जयंतीबाबत महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. २२ जुलै रोजी साजरी होणारी त्यांची जयंती राज्यभर शासकीय स्तरावर साजरी केली जाणार असून, यासंदर्भात सामान्य प्रशासन विभागाने अधिकृत शासनादेश जारी केला आहे.

या दिवशी राज्यातील सर्व शासकीय कार्यालयांमध्ये त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्याचे अधिकृत आदेश राज्य शासनाने जारी केले. शासनाच्या या निर्णयामुळे अजितदादांच्या लोकसेवेचा वारसा आता अधिकृतपणे जपला जाणार आहे.

राष्ट्रवादीच्या नेत्यांच्या मागणीची दखल

राज्य शासनाने एक अत्यंत महत्त्वपूर्ण निर्णय घेत स्वर्गीय अजितदादा पवार यांच्या जयंतीचा समावेश सन २०२६ मधील राष्ट्रपुरुष व थोर व्यक्तींच्या अधिकृत जयंती कार्यक्रमांमध्ये केला आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते छगन भुजबळ आणि हसन मुश्रीफ यांनी मंगळवारी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे ही मागणी केली होती. या मागणीची तत्काळ दखल घेत सामान्य प्रशासन विभागाने या संदर्भातील अधिकृत



परिपत्रक जारी केले असून, अजितदादांच्या महाराष्ट्राच्या विकासातील योगदानाचा गौरव करण्यात आला आहे.

शाळा आणि महाविद्यालयांमध्येही होणार अभिवादन

शासनाने काढलेल्या परिपत्रकानुसार, येत्या बुधवारी, २२ जुलै २०२६ रोजी राज्यभरात अजितदादा पवार यांची जयंती साजरी केली जाईल. या दिवशी मंत्रालयासह राज्यातील सर्व शासकीय आणि निमशासकीय कार्यालये, तसेच सर्व शाळा आणि महाविद्यालयांमध्ये दादांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून त्यांच्या स्मृतींना उजाळा दिला जाणार आहे. या कार्यक्रमाचे योग्य नियोजन आणि अंमलबजावणी करण्याचे स्पष्ट निर्देश सर्व विभागीय आयुक्त आणि जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आले आहेत.



# माजलगाव बायपास घाणीच्या विळख्यात

### अनियंत्रित कचरा टाकल्याने शहराच्या स्वच्छतेवर प्रश्नचिन्ह,नागरिकांचा संताप

माजलगाव । प्रतिनिधी

झपाट्याने विकसित होत असलेल्या माजलगाव शहराची ओळख बायपास परिसरातील वाढत्या कचऱ्यामुळे मलिन होत आहे. नगरपरिषद तसेच आजूबाजूच्या ग्रामपंचायतींकडून योग्य नियोजन नसल्याने बायपासवर मोठ्या प्रमाणात घाण व कचरा टाकला जात असल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे.

माजलगाव हे बीड जिल्ह्यातील आर्थिकदृष्ट्या प्रगत शहर असून, शहराचा वेगाने विस्तार होत आहे. मात्र, वाढत्या नागरीकरणासोबत कचरा व्यवस्थापनाकडे दुर्लक्ष झाल्याने बायपास परिसर अस्वच्छ झाला

पान २ वर...

# गेवराईच्या सर्वांगीण विकासासाठी पंकजाताई मुंडेंची ग्वाही



## विविध विकासकामांचे उद्घाटन, अतिक्रमणधारकांना पीटीआरचे वाटप, 'वीज बिलमुक्त नगरपरिषद' संकल्पना

गेवराई । प्रतिनिधी

राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री पंकजाताई मुंडे यांच्या हस्ते गेवराई नगरपरिषदेच्या विविध विकासकामांचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी अतिक्रमणधारकांना पीटीआरचे वाटप करण्यात आले.

यावेळी बोलताना पंकजाताई मुंडे यांनी स्वच्छ, सुंदर आणि प्रगत गेवराई घडविण्यासाठी लोकसहभाग आवश्यक असल्याचे सांगितले. महिला बचत गटांच्या माध्यमातून सुरू असलेल्या स्वच्छता उपक्रमाचे कौतुक करत 'वीज बिलमुक्त नगरपरिषद' ही संकल्पना राबविण्याच्या सूचना त्यांनी दिल्या.घनकचरा प्रक्रियेतून नगरपरिषदेला कायमस्वरूपी उत्पन्न मिळविणे, रस्ता रुंदीकरणाचा प्रश्न मार्गी लावणे आणि शहराच्या विकासासाठी अल्प, मध्यम व दीर्घकालीन नियोजन करण्याचे निर्देश त्यांनी प्रशासनाला दिले.

याप्रसंगी माजी राज्यमंत्री बदामराव पंडित, नगराध्यक्षा गीताभाभी पवार, बाळराजे पवार, जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, युद्धाजित पंडित यांच्यासह नगरसेवक व अधिकारी उपस्थित होते.गेवराईकरांच्या समस्या सोडविण्याची जबाबदारी माझी असून दिलेले प्रत्येक आश्वासन पूर्ण करणार, अशी ग्वाही पंकजाताई मुंडे

# जिल्हाधिकाऱ्यांच्या नावाचे झाड वाळून कोसळले, पाटी मात्र ताठ!

## ३१ लाख वृक्षलागवडीच्या उद्दिष्टात संवर्धनाकडे दुर्लक्ष, 'हरित अभियान'वर प्रश्नचिन्ह



गेल्या वर्षी एका दिवसात ३० लाख वृक्षलागवड करताना पालवण येथील रेल्वे स्थानक परिसरात जिल्हाधिकारी यांच्या नावाची पाटी असलेले झाड वाळुन गेले होते मात्र उभं होतं...... डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर

वर्षभरात जिल्हाधिकारी यांच्या नावाची पाटी असलेले वाळुन गेलेले झाड आता आडवं झालंय..... मात्र जिल्हाधिकारी यांच्या नावाची पाटी ताठ मानेने उभी आहे.... यातच समाधान आहे.... डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर

बीड । प्रतिनिधी

राज्य शासनाच्या ३१ लाख वृक्षलागवडीच्या उद्दिष्टानुसार बीड जिल्ह्यात विविध विभागांकडून वृक्षारोपण करण्यात येत आहे. मात्र, पालवण रेल्वे स्थानक परिसरात जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या नावाची पाटी असलेले झाड वाळून उन्मळून पडल्याने वृक्षसंवर्धनाबाबत प्रशासनाच्या दाव्यांवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

अलीकडेच जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत वृक्षलागवडीबरोबरच प्रत्येक वृक्षाचे संगोपन व जिवंत राहण्यावर भर देण्याच्या सूचना देण्यात आल्या होत्या. मात्र प्रत्यक्षात झाड वाळल्याने संवर्धनाकडे दुर्लक्ष झाल्याची टीका होत आहे.

डॉ. गणेश ढवळे यांनी, झाड वाळून पडले, पण जिल्हाधिकाऱ्यांच्या नावाची पाटी मात्र ताठ उभी आहे; यातच बीडकरांचे समाधान सामावले आहे, असा उपरोधिक टोला लगावला.

३१ लाख वृक्षलागवडीचे उद्दिष्ट..

सामाजिक वनीकरण - १४ लाख

वन विभाग - ६.५० लाख

कृषी - ५ लाख

ग्रामविकास - २.४१ लाख

वन्यजीव - १.०८ लाख

शिक्षण - १ लाख

महसूल - ५० हजार

नगरपरिषद/नगरपंचायत - ५० हजार

'हरित अभियान' की

पान २ वर...

# अकोल्यात १९ जुलै रोजी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्यस्तरीय अधिवेशन

## पत्रकार संघाच्या राज्यस्तरीय अधिवेशनाला मोठ्या संख्येने उपस्थित राहावे - प्रदेश संपर्कप्रमुख वैभव स्वामी

बीड । प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, मुंबई आणि पत्रकार हल्ला विरोधी कृती समिती यांच्या वतीने रविवार, दि. १९ जुलै २०२६ रोजी सकाळी १०.०० ते सायंकाळी ७.०० या वेळेत हॉटेल कृष्णा इम्पिरियल, नवीन बसस्थानकाजवळ, अकोला येथे महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबईचे राज्यस्तरीय अधिवेशन आयोजित करण्यात आले आहे. राज्यभरातील पत्रकार, संपादक, वृत्तनिवेदक, छायाचित्रकार व माध्यम क्षेत्रातील मान्यवरांच्या उपस्थितीत हे अधिवेशन होणार असून यामध्ये पत्रकारांच्या विविध प्रश्नांवर मंथन केले जाणार आहे. पत्रकार संघाच्या या महत्त्वपूर्ण राज्यस्तरीय अधिवेशनाला राज्यभरातील पदाधिकारी, सदस्य,पत्रकार,पत्रकार प्रेमी नागरिक यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन पत्रकार संघाचे प्रदेश संपर्कप्रमुख वैभव स्वामी यांनी केले आहे.

अधिवेशनाचे उद्घाटन महाराष्ट्राचे कामगार मंत्री तथा अकोला जिल्ह्याचे पालकमंत्री मा. आकाश फुंडकर यांच्या हस्ते होणार असून कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष मा. निलेश सोमाणी राहणार आहेत.



प्रमुख पाहुणे म्हणून मा. न्यायमूर्ती शंभ्रलाल मेश्राम (माजी न्यायाधीश, मुंबई), श्री संजय भोकरे प्रदेश संघटक,श्री डॉ.विश्वासराव आरोटे प्रदेश सरचिटणीस, खासदार मा. अनूपजी धोत्रे, आमदार डॉ. विश्वासराव आत्रे, आमदार रणधीर सावरकर, आमदार संजय भोकरे, आमदार साजिद खान पठाण, आमदार वसंत खंडेलवाल, आमदार नितीन देशमुख, आमदार हरीश पिंपळे उपस्थित राहणार आहेत.

तर कार्यक्रमात प्रमुख उपस्थिती म्हणून माजी आमदार नारायणराव गव्हाणकर, माजी आमदार डॉ. संतोष हुशे, माजी आमदार बळीरामजी सिरसकर, जिल्हाध्यक्ष प्रकाश तायडे (राष्ट्रीय काँग्रेस), संचालक सदाफराजी लांडे (महाराष्ट्र बाजार समिती सहकारी संघ, पुणे), जिल्हाध्यक्ष श्रीकृष्ण अंधारे (राकाँ., अकोला) तसेच लोकसभा समन्वयक संदीपदादा पाटील उपस्थित राहणार आहेत.

दुपारी आयोजित परिसंवादात पत्रकारांवरील होत असलेले हल्ले व शिस्तभंगाच्या कारवाई या महत्त्वाच्या विषयावर ज्येष्ठ पत्रकार तथा राजकीय विश्लेषक मा. निरंजन टकले, मुक्त पत्रकार व एबीपी माझाचे संपादक मा. हिना कोसर, दैनिक देशोन्नतीचे मुख्य संपादक मा. प्रकाश पोहरे, पत्रकार हल्ला विरोधी कृती समितीचे प्रदेशाध्यक्ष मा. गोविंद वाकडे, एएनएन न्यूजचे संपादक मा. निलेश धांडे, प्रदेश महासचिव मा. राजेंद्र पाटोळे यांच्यासह अन्य मान्यवर मार्गदर्शन करणार आहेत.

सकाळच्या पुरस्कार सोहळ्याचे उद्घाटन पोलीस अधीक्षक मा. अर्चित चांडक यांच्या हस्ते होईल. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विदर्भ प्रमुख मा. नयन मुंढे राहणार असून प्रमुख उपस्थितीमध्ये प्रदेश प्रसिद्धी प्रमुख मा. नवनाथ जाधव, राज्य उपाध्यक्ष मा. प्रा. महेश पानसे, प्रदेश उपाध्यक्ष मा. किशोर रायासाकडा, प्रदेश संपर्क प्रमुख मा. वैभव स्वामी, मुख्य संपादक मा. मधुकरराव बावणे, विदर्भ अध्यक्षा श्रीमती अलका पचारे, प्रदेश संपर्क प्रमुख मा. अनुप भार्गव, माजी आमदार मा. हरिदास भदे आणि ग्रामीण पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष मा. गजानन वाघमारे उपस्थित राहणार आहेत.

यावेळी पत्रकारिता क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल मा. धनंजय सावळे (आज तक) - कृषी पत्रकारिता, मा. हर्षवर्धन सोनोने (प्रहार २४

पान २ वर...

शुद्ध सोने ! अप्रतिम कलाकुसर !! विश्वासाची परंपरा !!!
प्रमाणित सुवर्ण अलंकाराचे AC दालन
दहिवाळ सुवर्णकार
नवीन पत्ता : डी.पी.रोड, सहयोगनगर, सारडा नगरी जवळ, बीड
☎: 0230377, मो. 8432771777
शाखा : माळीवेस, बीड
☎: 0220377, मो. 9405072777

## संपादकीय....

# पाऊले चालती.

फिफा विश्वचषक फुटबॉल स्पर्धेत मंगळवारी मध्यरात्री (भारतीय वेळेनुसार बुधवारी १२.३० वाजता) फ्रान्स आणि स्पेन या दोन युरोपियन खंडातील फुटबॉल महासत्तांमध्ये पहिला उपान्त्य सामना विलक्षण रंगला. आक्रमणावर भर देणारा फ्रान्स आणि भक्कम बचाव करणारा स्पेन यांच्यातील जुगलबंदीकडे सा-यांचे लक्ष लागले होते. यंदाच्या स्पर्धेत स्पेनने अवघा एक गोल खाल्ला आहे. यावरून त्यांचा भक्कम बचाव लक्षात येतो. एम्बाप्पे विरुद्ध उनाई सिमॉन, लॅमिन यमाल यांच्यातील द्वंद्व निर्णायक ठरणार होते. फिफा विश्वचषकाचा थरार गत महिनाभरापासून सुरू असून आता ही स्पर्धा उपान्त्य फेरीच्या टप्प्यावर आहे. फ्रान्स, मोरोक्को, स्पेन, बेल्जियम, इंग्लंड, नॉर्वे, अर्जेंटिना व स्वित्झर्लंड या आठ संघांनी उपान्त्यपूर्व फेरीत प्रवेश केला होता.

त्यापैकी फ्रान्स, स्पेन, इंग्लंड व अर्जेंटिना या संघांनी आगेकूच केली, तर अन्य चार संघांची वाटचाल संपुष्टात आली. फ्रान्सने सलग तिस-यांदा विश्वचषकाची उपान्त्य फेरी गाठली आहे. १९९८ व २०१८ च्या विजेत्या फ्रान्सला २०२२ मध्ये अंतिम फेरीत पराभव पत्करावा लागला होता. फ्रान्स हा सलग तीन विश्वचषकांत किमान उपान्त्य फेरी गाठणारा तिसरा देश ठरला. यापूर्वी ब्राझील व जर्मनीने अशी कामगिरी केली होती. रॉड्रीच्या नेतृत्वाखाली खेळणा-या स्पेनने यंदा साखळी फेरीत ह-गटातून अग्रस्थानासह आगेकूच करताना सौदी अरेबिया व उरुग्वे संघांना धूळ चारली तर केप व्हर्डेविरुद्ध बरोबरी पत्करली. त्यानंतर बाद फेरीत (राऊंड ऑफ ३२) ऑस्ट्रियाला ३-० असे पराभूत केले. उपउपान्त्यपूर्व लढतीत रोनाल्डोच्या पोर्तुगालचा स्वप्नभंग करताना १-० असा विजय मिळवला. या पाचही लढतींत स्पेनने एकही गोल स्वीकारला नव्हता. उपान्त्यपूर्व फेरीत बेल्जियमविरुद्ध त्यांनी २-१ असा विजय मिळवला मात्र, गोल न खाण्याची मालिका खंडित झाली. स्पेनने २०१० नंतर प्रथमच उपान्त्य फेरी गाठली.

स्पेनचा गोलरक्षक सिमॉनसह अन्य बचावपटूंना भेदण्यात बेल्जियम व्यतिरिक्त कोणालाही यश मिळाले नव्हते. त्यामुळे स्पेनच्या बचावफळीविरुद्ध फ्रान्सच्या आक्रमकांचा कस लागणार होता. मंगळवारी झालेल्या अत्यंत चुरशीच्या उपान्त्य फेरीच्या सामन्यात स्पेनने जेतेपदाचा प्रबळ दावेदार मानल्या जाणा-या फ्रान्सचा २-० असा पराभव केला.

पान १ वरुन..

**माजलगाव बायपास ...**

आहे. त्यामुळे शहराच्या प्रतिमेला धक्का बसत असून, प्रवासी व नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे.

बायपास परिसरातील कचऱ्याची तातडीने विल्हेवाट लावून स्वच्छता मोहीम राबवावी, अशी मागणी नागरिकांनी केली आहे. अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही देण्यात आला आहे.

**जिल्हाधिकाऱ्यांच्या..**

फोटोसेशन.?

डॉ. ढवळे यांनी वृक्षलागवडीनंतर संवर्धनाकडे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप करत, प्रत्येक लावलेल्या वृक्षाच्या संगोपनाची जबाबदारी निश्चित करून प्रभावी अंमलबजावणी करण्याची मागणी केली.

**अकोल्यात १९ जुलै ...**

तास) - डिजिटल पत्रकारिता, मा. जयेश जगड (झी न्यूज मराठी) - युद्धवार्ता पत्रकारिता,

पान १ वरुन..

मा. उमेश अलोने (एबीपी माझा) - प्रेरणादायी पत्रकारिता, मा. योगेश फरफट (दै. सकाळ) - आरोग्य पत्रकारिता, मा. अमोल नांदुरकर (लोकशाही न्यूज) - तिसरा डोळा पत्रकारिता तसेच मा. सतीश देशमुख, मा. औरंगजेब हुसेन, मा. विवेक गर्वड आणि मा. इरफान अहमद शेख यांना उत्कृष्ट पत्रकारिता पुरस्काराने गौरविण्यात येणार आहे.

याशिवाय जीवनगौरव पुरस्कार मा. मनोज पोटले, जीवनसंगम पुरस्कार मा. शौकतअली मिर, विवेकवादी पत्रकारिता पुरस्कार मा. देविदास चव्हाण आणि दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर स्मृती आदर्श शिक्षक पुरस्कार मा. गोपाळकृष्ण गुजराथी यांना प्रदान करण्यात येणार आहेत.

या राज्यस्तरीय अधिवेशनाचे आयोजन अकोला जिल्हाध्यक्ष श्री. गणेश नथुजी सुरजुसे यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आले असून देवानंद गहिले (पातूर), प्रदीप गावंडे (बार्शीटाकळी), संजय उमक (मूर्तीजापूर) आणि सम्राट वानखडे (बाळापूर) हे तालुकाध्यक्ष आयोजनात सक्रिय सहभाग घेत आहेत.

राज्यभरातील पत्रकारांनी या अधिवेशनास मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, मुंबईच्या वतीने प्रदेश संपर्कप्रमुख वैभव स्वामी यांनी केले आहे.

## प्राण्यांना जीवनदान; सोनवणेंचा शासनाकडून सन्मान

# मानद वन्यजीवनरक्षक पदी निवड, प्रशासनासोबत काम करण्याची संधी

शिरूर कासार / प्रतिनिधी

गेल्या २६ वर्षांपासून जखमी, आजारी आणि संकटात सापडलेल्या वन्यजीवांसाठी अविरतपणे कार्य करणारे सर्पराज्ञी वन्यजीव पुनर्वसन केंद्राचे संचालक सिद्धार्थ धोंडीराम सोनवणे यांची महाराष्ट्र शासनाने बीड जिल्ह्यासाठी 'मानद वन्यजीव रक्षक' म्हणून नियुक्ती केली आहे. त्यांच्या दीर्घकालीन वन्यजीव सेवा व संवर्धन कार्याची शासनस्तरावर दखल घेत झालेल्या या नियुक्तीमुळे जिल्ह्यातील वन्यजीव संरक्षण चळवळीला अधिक बळ मिळणार आहे.

महाराष्ट्र शासनाच्या महसूल व वन विभागाने प्रसिद्ध केलेल्या शासन निर्णयानुसार राज्यातील विविध जिल्ह्यांसाठी मानद वन्यजीव रक्षकांच्या नियुक्त्या जाहीर केल्या आहेत. यामध्ये बीड जिल्ह्यासाठी सिद्धार्थ सोनवणे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. ही नियुक्ती पुढील तीन वर्षांच्या कालावधीसाठी आहे. मानद वन्यजीव रक्षक म्हणून सोनवणे यांच्यावर जिल्ह्यातील वन्यजीवांचे संरक्षण व संवर्धन, जखमी व अडकलेल्या वन्यजीवांच्या सुटकेसाठी मदत, उपचार व पुनर्वसन कार्यात सहकार्य, बेकायदेशीर शिकार आणि वन्यजीव तस्करी रोखण्यासाठी वन विभागाला सहाय्य करणे, वन्यजीव संरक्षणा बाबत जनजागृती तसेच मानव-वन्यजीव संघर्ष कमी करण्यासाठी प्रयत्न करणे आदी महत्त्वपूर्ण जबाबदाऱ्या असणार आहेत. सिद्धार्थ सोनवणे हे सुमारे २६ वर्षांपासून सर्पराज्ञी वन्यजीव पुनर्वसन केंद्राच्या माध्यमातून वन्यजीव संरक्षण आणि पुनर्वसन क्षेत्रात कार्यरत आहेत. निसर्गात जखमी, आजारी तसेच आईपासून दुरावलेल्या २० हजारांहून अधिक वन्यजीवांवर उपचार करून त्यांना नवजीवन देण्याचे उल्लेखनीय कार्य त्यांनी केले आहे.

त्यांच्या पुनर्वसन कार्यामध्ये मोर, घुबड, गरुड, गिधाड यांसारख्या विविध पक्ष्यांसह लांडगा, तरस, बिबट, काळवीट आणि खवले मांजर यांसारख्या वन्य प्राण्यांचा समावेश आहे. सामान्य प्रजातींपासून दुर्मिळ आणि संकटग्रस्त वन्यजीवांच्या संरक्षण व संवर्धनासाठी त्यांनी सातत्याने योगदान दिले आहे.प्रदीर्घ कार्याची दखल सिद्धार्थ सोनवणे यांनी गेल्या २६ वर्षांत सर्पराज्ञी वन्यजीव पुनर्वसन केंद्राच्या माध्यमातून २० हजारांहून अधिक जखमी, आजारी आणि संकटग्रस्त वन्यजीवांवर उपचार व पुनर्वसन केले आहे. दुर्मिळ आणि संकटग्रस्त प्रजातींच्या संवर्धनासाठी केलेल्या या प्रदीर्घ कार्याची शासनाने दखल घेत त्यांची बीड जिल्ह्याच्या मानद वन्यजीव रक्षक पदी नियुक्ती केली आहे.

## बोगस बियाणे-खते प्रकरणी कठोर कायदा करा - वसंत मुंडे

पुणे । प्रतिनिधी

निकृष्ट खते, बोगस बियाणे, कीटकनाशके व औषधांबाबत राज्यभरातून हजारो तक्रारी होत असतानाही केंद्र व राज्य सरकार कठोर कायदा करत नसल्याचा आरोप महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस ओबीसी विभागाचे प्रदेश उपाध्यक्ष वसंत मुंडे यांनी केला.

शेतकऱ्यांना बोगस कृषी निविष्ठांमुळे होणाऱ्या नुकसानीची भरपाई कायद्याने मिळावी, तसेच किमान आधारभूत किंमत व पीकविमा अधिक प्रभावीपणे राबवावा, अशी त्यांनी मागणी केली.खते, बियाणे, कीटकनाशके व कृषी औषधांची गुणवत्ता तपासण्यासाठी संबंधित अधिकारी व कंपन्यांची नियमित तपासणी करून प्रयोगशाळेत नमुने तपासावेत. दोषी कंपन्यांवर कठोर कारवाई करून शेतकऱ्यांचे हित जपावे, असेही वसंत मुंडे यांनी म्हटले.




## 'दिल दिवाना हो गया' ३१ जुलैला प्रदर्शित

मुंबई प्रतिनिधी

दिग्दर्शक राजीव श्यामलाल सोनी यांच्या 'दिल दिवाना हो गया' या रोमँटिक फॅमिली ड्रामाचा ट्रेलर आणि संगीत अनावरण सोहळा मुंबईत पार पडला. ग्रँडवे प्रॉडक्शन्स निर्मित या चित्रपटातून काजल चौहान, भानूज सूद आणि शुभकरण भोपाल बॉलिवूडमध्ये पदार्पण करत आहेत.

चित्रपटात मुश्ताक खान, अरुण बक्षी, बृज गोपाल, राजू खेर, गरिमा अग्रवाल, अंजली गुप्ता आणि दिव्या द्विवेदी यांच्या महत्त्वपूर्ण भूमिका आहेत. संगीत विष्णू नारायण यांचे असून, चित्रपट ३१ जुलै २०२६ रोजी देशभरातील चित्रपटगृहांत प्रदर्शित होणार आहे.छायाचित्र : रमाकांत मुंडे, मुंबई



बीड: महाराष्ट्राचे पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाचे मंत्री गुलाबराव पाटील बीड दौऱ्यावर आले असता शिवसेना अल्पसंख्याक विभागाच्या वतीने त्यांचा सत्कार करताना शिवसेना अल्पसंख्याक जिल्हाप्रमुख मोहम्मद अझरुद्दीन ए.एस. गोलू ,शिवसेना अल्पसंख्याक जिल्हाप्रमुख इरफान कुरेशी यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.


**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२६/सेतु/कावि-३०३ दि.०८.०७.२०२६**

### जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **शेख नाहेदा अ.लतीफ, रा.शहागड ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **स्वत**ःच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म /मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | शेख नाहेदा अ.लतीफ | स्वतः | ०८.०८.१९७९ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- -/-/२०२६ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२६/सेतु/कावि-३०२ दि.०८.०७.२०२६**

### जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **शेख इरशाद बेगम अ.लतीफ, रा.शहागड ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **स्वत**ःच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | शेख इरशादबेगम अ.लतीफ | स्वतः | १२.०६.१९७६ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- -/-/२०२६ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२६/सेतु/कावि-३०२ दि.०८.०७.२०२६**

### जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **शेख फयमुदा लतीफ, रा.शहागड ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **स्वत**ःच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म /मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | शेख फयमुदा लतीफ | स्वतः | ०१.०१.१९७१ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- -/-/२०२६ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२६/सेतु/कावि-३०४ दि.०८.०७.२०२६**

### जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **शेख अंजुम लतीफ, रा.शहागड ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **स्वत**ःच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म /मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | शेख अंजुम लतीफ | स्वतः | ०३.०७.१९८२ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- ०८/०७/२०२६ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२६/सेतु/कावि-३०० दि.०८.०७.२०२६**

### जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **श्री शमशाद अ.लतीफ, रा.शहागड ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **स्वत**ःच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म /मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | शमशाद अ.लतीफ | स्वतः | ०५.०६.१९७५ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- ०८/०७/२०२६ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२६/सेतु/कावि-३०१ दि.०८.०७.२०२६**

### जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **फौजिया जहिर शेख, रा.शहागड ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **स्वत**ःच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म /मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | फौजिया जहिर शेख | स्वतः | ०८.०७.१९९९ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- ०८/०७/२०२६ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२६/सेतु/कावि-३०६ दि.०८.०७.२०२६**

### जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **शेख शाहेदा बेगम लतीफ, रा.शहागड ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **स्वत**ःच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.


| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | शेख शाहेदा बेगम लतीफ | स्वतः | ०१.०९.१९७१ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- ०८/०७/२०२६ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**



पुणे – महाराष्ट्र राज्याचे साखर आयुक्त डॉ. संजय कोलते साहेब यांनी संयुक्त महाराष्ट्र मराठी पत्रकार महासंघ मुंबई अध्यक्षपदी गोविंद घोळवे यांची नियुक्ती झाल्याबद्दल सत्कार केला.

# जि.प. प्राथमिक शाळा वडवणीला गणेश आबा कुरकूटे यांच्याकडून ४२ इंच स्मार्ट टीव्ही भेट

## विद्यार्थ्यांना डिजिटल शिक्षणासाठी मोलाची मदत

वडवणी । प्रतिनिधी

वडवणी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, रामबाग येथे शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष गणेश टकले यांच्या अध्यक्षतेखाली कार्यक्रम आयोजित करण्यात आला. यावेळी नगरसेवक नागेश भाऊ डिगे, युवा नेते गणेश आबा कुरकूटे, पत्रकार शंकर झाडे व मुख्याध्यापिका श्रीमती तिडके मॅडम यांची प्रमुख उपस्थिती होती.

विद्यार्थ्यांना आधुनिक व दर्जेदार डिजिटल शिक्षणाची सुविधा मिळावी या उद्देशाने गणेश आबा कुरकूटे यांच्या



वतीने शाळेला ४२ इंच स्मार्ट एलईडी टीव्ही भेट देण्यात आला. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना तंत्रज्ञानाधारित शिक्षण अधिक प्रभावीपणे घेता येणार असून शैक्षणिक गुणवत्तेत भर पडणार आहे.यावेळी समितीचे उपाध्यक्ष शामराव उजगरे, पत्रकार नारायण जाधव, शिवप्रसाद गुरसाळी, राहुल टकले, दत्तात्रय कुरकूटे, सिद्धेश्वर झाडे, रामेश्वर कुरकूटे, नंदकुमार कुरकूटे, बुरझाडे भाऊजी, गजानन वाव्हळ, अशोक म्हेत्रे, शिक्षक लतिफे सर, घुगे सर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दिपक आळणे सर यांनी केले, तर मुख्याध्यापिका श्रीमती तिडके मॅडम यांनी आभार मानले. उपस्थितांनी गणेश आबा कुरकूटे यांच्या सामाजिक व शैक्षणिक योगदानाचे कौतुक केले.

# आंतरजिल्हा दुचाकी चोरी करणारी टोळी जेरबंद

## २९ मोटारसायकली जप्त, १५ गुन्ह्यांची उकल

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यात वाढत्या दुचाकी चोरीच्या गुन्ह्यांचा छडा लावण्यासाठी स्थानिक गुन्हे शाखेने राबविलेल्या विशेष मोहिमेत आंतरजिल्हा दुचाकी चोरी करणाऱ्या टोळीचा पर्दाफाश करण्यात आला. या कारवाईत दोन आरोपींना अटक करून त्यांच्या ताब्यातून विविध कंपन्यांच्या २९ चोरीच्या मोटारसायकली जप्त करण्यात आल्या असून, सुमारे १४ लाख ९० हजार रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. या कारवाईमुळे १५ गुन्ह्यांची उकल झाली आहे.



जिल्हा पोलीस अधीक्षकांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड यांनी दुचाकी चोरीच्या गुन्ह्यांच्या तपासासाठी पोलीस उपनिरीक्षक विघ्ने यांच्या नेतृत्वाखाली विशेष पथकाची नियुक्ती केली होती.

दि. १४ जुलै २०२६ रोजी पथक गेवराई उपविभागातील सिरसदेवी परिसरात गस्त घालत असताना विना क्रमांकाची संशयास्पद मोटारसायकल आढळून आली. वाहनचालक गणेश सुदाम बहीर (रा. पांढरवाडी) यास ताब्यात घेऊन चौकशी केली असता, सदर मोटारसायकल चोरीची असल्याची कबुली त्याने दिली. तसेच त्याचा साथीदार वैभव बाबासाहेब खेडकर (रा. माहीजळगाव, ता. जामखेड, जि. अहिल्यानगर) याने चोरी केलेल्या मोटारसायकली विक्रीसाठी दिल्याची माहिती दिली.

या माहितीच्या आधारे पोलिसांनी गणेश बहीर याच्याकडून १४ चोरीच्या मोटारसायकली जप्त केल्या. त्यानंतर माहीजळगाव येथे छापा टाकून वैभव खेडकर यास ताब्यात घेण्यात आले. चौकशीत त्याने बीड, अहिल्यानगर, पुणे शहर, पुणे ग्रामीण, सांगली व सोलापूर ग्रामीण जिल्ह्यांतून एकूण २९ मोटारसायकली चोरी केल्याची कबुली दिली. त्याच्या ताब्यातून आणखी १५ मोटारसायकली जप्त करण्यात आल्या.

दोन्ही आरोपींकडून एकूण २९ मोटारसायकली (किंमत अंदाजे १४.९० लाख) जप्त करण्यात आल्या असून, त्याआधारे १५ गुन्ह्यांची उकल करण्यात पोलिसांना यश आले आहे.

तपासादरम्यान आरोपी वैभव बाबासाहेब खेडकर हा सराईत गुन्हेगार असून, सन २०२२-२३ मध्ये जामखेड पोलीस ठाण्यात दुचाकी चोरीचे सुमारे ३० गुन्हे दाखल असल्याची माहिती समोर आली आहे.या प्रकरणाचा पुढील तपास स्थानिक गुन्हे शाखेकडून सुरू असून, जप्त केलेल्या दुचाकींची मूळ मालकांना परत देण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे.

# रील्स, हत्या आणि दहशत; गुन्हेगारांचा नवा फंडा.?

## सोशल मीडियावर 'भाईगिरी'चे प्रदर्शन, कायद्याचा धाक निर्माण करण्याची गरज

स्पेशल रिपोर्ट । प्रशांत बाफना

श्रीरामपूर येथील तरुण व्यावसायिक आकाश दुबैय्या यांच्या भरदिवसा झालेल्या हत्येने जिल्हा हादरला असून, या घटनेच्या निषेधार्थ शहरात सलग चौथ्या दिवशी बंद पाळण्यात आला. सर्वपक्षीय नागरिकांनी मोर्चा काढत दोषींवर कठोर कारवाईची मागणी केली.

मृताच्या वडिलांनी बेग टोळी आणि सागर बेग यांच्यावर गंभीर आरोप केले आहेत. मात्र सागर बेग यांनी हे आरोप फेटाळून लावत राजकीय वैमनस्यातून बदनामी केली जात असल्याचा दावा केला आहे. या प्रकरणातील सत्य पोलीस तपासातूनच स्पष्ट होणार आहे.

प्राथमिक तपासात आरोपींनी हॉटेलमध्ये खोली घेतल्यानंतर जेवणाच्या कारणावरून वाद होऊन हत्या झाल्याचे समोर आले आहे. दरम्यान, आरोपींचे गुन्हेगारी नेटवर्क आणि त्यांच्या हालचालींचा तपास सुरू आहे.

या घटनेनंतर सोशल मीडियावर कोयते, तलवारी, पिस्तुले आणि 'भाईगिरी' दाखवणाऱ्या रील्सचा मुद्दा पुन्हा ऐरणीवर आला आहे. अशा रील्समुळे गुन्हेगारीचे उदात्तीकरण होत असून तरुणांवर विपरीत परिणाम होत असल्याची चिंता व्यक्त केली जात आहे.जिल्हा पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन व अप्पर पोलीस अधीक्षक सोमनाथ वाकचौरे यांच्या मार्गदर्शनाखाली या प्रकरणाचा सखोल तपास सुरू असून, सोशल मीडियावर दहशत पसरविणाऱ्या प्रवृत्तींवरही कठोर कारवाई करण्याची मागणी जोर धरत आहे.

श्रीरामपूर येथील तरुण व्यावसायिक आकाश दुबैय्या यांच्या भरदिवसा झालेल्या हत्येने जिल्हा हादरला

# गुटखा-वाळू सिंडीकेटचा कथित दलाल पोलीस शंकर चौधरी निलंबित

अहिल्यानगर । प्रतिनिधी

**श्रीरामपूरातील हॉटेल व्यावसायिक आकाश दुबैय्या यांच्या हत्येनंतर वाढत्या संघटित गुन्हेगारीच्या पार्श्वभूमीवर जिल्हा पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांनी पोलीस अंमलदार शंकर चौधरी यांना निलंबित केले आहे. विविध तक्रारी आणि प्राथमिक चौकशीच्या आधारे ही कारवाई करण्यात आल्याची माहिती आहे.**

शंकर चौधरी यांच्यावर गुटखा व अवैध वाळू तस्करीशी कथित संबंध असल्याचे आरोप होत होते. या आरोपांची सत्यता चौकशीनंतर स्पष्ट होणार असली, तरी या निलंबनामुळे पोलीस दलात खळबळ उडाली आहे.

पोलीस अधीक्षकांच्या या कारवाईचे स्वागत होत असून, अवैध धंद्यांना संरक्षण देणाऱ्यांवरही कठोर कारवाईचा स्पष्ट संदेश यातून गेला आहे. दरम्यान, अशाच प्रकारच्या तक्रारी असलेल्या काही अन्य कर्मचाऱ्यांचीही चौकशी सुरू असल्याची चर्चा असून, अधिकृत पुष्टी अद्याप झालेली नाही.

## महाराष्ट्रातील ३८ रक्तपेढ्यांवर एफडीएची कारवाई

# ३४ परवाने निलंबित

मुंबई : राज्यभरात एफडीए आयुक्त तुकाराम मुंढे यांनी अन्नभेसळ आणि अमली पदार्थांविरोधात कारवाईचा धडाका सुरु केला आहे. त्यानंतर आता महाराष्ट्रात सुरक्षित, दर्जेदार आणि प्रमाणित रक्ताची उपलब्धता सुनिश्चित करण्यासाठी, एफडीएने रक्त साठवणूक केंद्रांविरुद्ध एक व्यापक मोहीम सुरू केली आहे. या मोहिमेअंतर्गत ३८ संस्थांवर कठोर कारवाई करण्यात आली आहे. तसेच ३४ परवाने निलंबित करण्यात आले असून चार कायमस्वरूपी रद्द करण्यात आले आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, एफडीएने नियमांचे उल्लंघन करणाऱ्या रक्त केंद्रे आणि रक्त साठवणूक केंद्रांविरुद्ध कारवाई करण्यास सुरुवात केली आहे. महाराष्ट्रामध्ये सध्या ४१३ परवानाधारक रक्त केंद्रे आणि ४६८ परवानाधारक रक्त साठवणूक केंद्रे आहेत. या सर्व केंद्रावर एफडीएने कडक नजर ठेवली आहे. एप्रिल ते जून दरम्यान केलेल्या



तपासणीत अनियमितता उघड झाल्यामुळे २१ रक्त केंद्रे आणि १३ रक्त साठवणूक केंद्रांचे परवाने निलंबित करण्यात आले.

त्याचबरोबर, दोन रक्त केंद्रे आणि दोन रक्त साठवणूक केंद्रांचे परवाने कायमस्वरूपी रद्द करण्यात आले. या तपासणीदरम्यान, परवान्याच्या अटींचे उल्लंघन, गुणवत्ता व्यवस्थापनातील त्रुटी, नोंदींमधील विसंगती आणि तापमान नियंत्रण, रक्त तपासणी, जैववैद्यकीय कचरा व्यवस्थापन व इतर वैधानिक मानकांचे पालन न करणे यासह गंभीर त्रुटी आढळून आल्या.

# वारंवार वीज खंडित, प्रभाग ७ मधील नागरिकांचा संताप

## महावितरणकडे निवेदन; तातडीने उपाययोजना न झाल्यास आंदोलनाचा इशारा

बीड । प्रतिनिधी

बीड शहरातील प्रभाग क्रमांक ७ मध्ये वारंवार खंडित होणाऱ्या वीजपुरवठ्यामुळे नागरिकांना मोठ्या गैरसोयींचा सामना करावा लागत असल्याच्या पार्श्वभूमीवर नगरसेवक जगदीश गुरखुदे व नगरसेविका भाग्यश्री सागर देशपांडे यांनी महावितरणचे अधीक्षक अभियंता राजपूत यांना निवेदन देत तातडीने उपाययोजना करण्याची मागणी केली.

निवेदनानुसार, सावरकर शाळा परिसर, सराफ रोड, बोबडेश्वर गल्ली, छापखाना गल्ली, थिगळे गल्ली, जटाशंकर गल्ली, झेंड गल्ली, काळे गल्ली, माजी आमदार देशमुख गल्ली तसेच चुन गल्ली डीपी



परिसरात नदीपात्रातून जाणाऱ्या वीजवाहिन्या, झाडांच्या फांद्या आणि डीपीवरील वाढलेला भार यामुळे वारंवार वीजपुरवठा खंडित होत आहे.

या समस्येमुळे नागरिक, विद्यार्थी, लहान मुले व ज्येष्ठ नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत असून विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक अभ्यासावरही परिणाम होत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

नदीपात्रातील वीजवाहिन्यांचे स्थलांतर, आवश्यकतेनुसार डीपीचे स्थलांतर आणि वाढलेला विद्युत भार कमी करण्यासाठी तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी मागणी करण्यात आली आहे. अन्यथा नागरिकांच्या वतीने लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही निवेदनातून देण्यात आला आहे.

# गहिनीनाथ गडाच्या मानाच्या पालखीचे पंढरपूरकडे उत्साहात प्रस्थान

शिरूर कासार प्रशांत बाफना

महाराष्ट्रातील तमाम वारकरी संप्रदायाचे श्रद्धास्थान आणि नवनाथ संप्रदायाचे प्रमुख केंद्र असलेल्या संतश्रेष्ठ गहिनीनाथ गडावरून आषाढी एकादशी निमित्त पंढरपूरकडे जाणाऱ्या आषाढी वारी पालखी सोहळ्याचे आज हजारो भाविकांच्या उपस्थितीत अत्यंत उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात प्रस्थान झाले. यावर्षीच्या पालखी सोहळ्याचे नेतृत्व आणि अध्यक्षपद गडाचे मठाधिपती ह.भ.प. श्री विठ्ठल महाराज शास्त्री भूषवत आहेत. टाळ-मृदंगाचा गजर, 'माऊली-तुकाराम' आणि 'संत गहिनीनाथ महाराज की जय' या जयघोषाने संपूर्ण गड परिसर भक्तीरसात न्हाऊन निघाला होता.

पहाटेपासूनच धार्मिक विधींची रेलचेलपालखी प्रस्थान सोहळ्यानिमित्त गहिनीनाथ गडावर पहाटेपासूनच विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

पहाटे मुख्य विठ्ठल रुक्मिणी मूर्ती आणि संत गहिनीनाथ महाराज यांच्या संजीवन समाधीला महाअभिषेक करण्यात आला. त्यानंतर भव्य महाआरती पार पडली. सकाळी गडावर विशेष कीर्तन आणि प्रवचनाचा कार्यक्रम झाला, ज्यामध्ये वारीचे महत्त्व आणि संतांचे विचार भाविकांसमोर मांडण्यात आले.

या धार्मिक विधींनंतर मुख्य गाभाऱ्यातून संत गहिनीनाथ महाराजांच्या पादुका अत्यंत आदराने आणि शिस्तीत बाहेर आणून सजवलेल्या पालखीमध्ये आणि रथात विराजमान करण्यात आल्या.

असा असेल पालखीचा मार्ग आणि मुक्काम..

ह.भ.प. श्री विठ्ठल महाराज शास्त्री यांच्या अध्यक्षतेखाली निघालेला हा पालखी सोहळा पारंपरिक मार्गाने पंढरपूरकडे मार्गस्थ होत आहे. या प्रवासात पालखी विविध गावांमधील भाविकांना दर्शनाचा लाभ देत पुढे जाईल.

पालखीचा मुख्य मार्ग खालीलप्रमाणे निश्चित करण्यात आला आहे:निगडी ते निवडुंगा: पालखीचे पहिले टप्पे आणि स्वागत.मतकुळी मैदान: या ठिकाणी पालखीचा भव्य विसावा आणि रिंगण सोहळा होणार आहे.सारोळा व पिंपळगाव उंडा: ग्रामीण भागातील भाविकांकडून पालखीचे स्वागत.तांदळवाडी व मिरगव्हाण: या मार्गावरून जात असताना ठीकठिकाणी अन्नदान आणि पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्यात आली आहे.वरकुटे मूर्तीचे व भोगेवाडी: भक्तांच्या निवासाची आणि भजनाची विशेष सोय.अरण: संत शिरोमणी सावता महाराज यांची ही कर्मभूमी असून, या ठिकाणी पालखीचा विशेष मुक्काम आणि दर्शन सोहळा होईल.पंढरपूर: शेवटी आषाढी एकादशीच्या महासोहळ्यासाठी पालखी चंद्रभागेच्या तीरावर म्हणजेच पंढरी नगरीत दाखल होईल.

शिस्तबद्ध वारी आणि प्रशासनाची तयारी..

पालखी सोहळ्यात हजारो वारकरी पायी चालत असून, वारीमध्ये महिला, तरुण आणि बाल गोपाळांचा मोठा सहभाग दिसत आहे. विठ्ठल महाराज शास्त्री यांनी सर्व वारकऱ्यांना शिस्तीचे पालन करण्याचे आवाहन केले आहे. मार्गावरील गावांमध्ये ग्रामस्थांनी रस्ते स्वच्छ करून, रांगोळ्या काढून आणि सडे टाकून पालखीच्या स्वागताची जय्यत तयारी केली आहे. प्रशासनाच्या वतीने



आरोग्य पथके, शुद्ध पिण्याचे पाणी आणि सुरक्षेसाठी पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे.हा भक्तीचा प्रवास पुढील काही दिवसांत विविध टप्पे पार करत विठ्ठलाच्या दर्शनासाठी पंढरपूरमध्ये विलीन होईल, ज्यामुळे संपूर्ण मराठवाडा आणि पश्चिम महाराष्ट्रात भक्तीचे वातावरण निर्माण झाले

## केंद्रप्रमुखांना दोन दिवसांचे प्रशिक्षण, शैक्षणिक गुणवत्ता

# वाढीसाठी जिल्हा परिषदेचा पुढाकार

बीड । प्रतिनिधी

जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागात नव्याने नियुक्त झालेल्या केंद्रप्रमुखांच्या तालुकानिहाय बैठका घेऊन त्यांना दोन दिवसांचे प्रशिक्षण दिले जाणार असून, त्याद्वारे जिल्ह्यातील शैक्षणिक गुणवत्ता वाढीसाठी विशेष प्रयत्न करण्यात येणार आहेत, अशी माहिती नूतन शिक्षणाधिकारी श्रीमती जयश्री चव्हाण यांनी दिली.

'निपुण भारत' अभियानांतर्गत जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, अंबाजोगाई आणि शिक्षण विभाग, जिल्हा परिषद बीड यांच्या संयुक्त विद्यमाने शासनाच्या निर्देशानुसार प्रशिक्षणाचे नियोजन करण्यात आले आहे. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितिन रहमान यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबविण्यात येत आहे.यापूर्वी आष्टी, पाटोदा आणि शिरूर तालुक्यांतील शैक्षणिक गुणवत्ता वाढीसंदर्भात आष्टी येथे विशेष बैठक घेण्यात आली. या बैठकीत शिक्षण क्षेत्रातील अधिकारी, शिक्षक आणि शिक्षणप्रेमी नागरिकांच्या सहभागातून गुणवत्ता वृद्धीसाठी विधायक निर्णय घेण्यात आले.




यावर्षी सरळसेवा व पदोन्नतीद्वारे नियुक्त झालेल्या केंद्रप्रमुखांना शैक्षणिक नेतृत्व, शाळा व्यवस्थापन आणि गुणवत्ता वृद्धीच्या दृष्टीने सक्षम करण्यासाठी तालुकानिहाय प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात येणार असल्याचे शिक्षणाधिकारी जयश्री चव्हाण यांनी सांगितले. या प्रशिक्षणातून जिल्ह्यातील विद्यार्थ्यांच्या गुणवत्तापूर्ण शिक्षणाला अधिक चालना मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

# 'पीएम श्री' आणि 'आदर्श शाळा' योजनेत बीड जिल्ह्याची दमदार झेप.!

## पहिल्या टप्प्यात ५१६ शाळांची निवड, प्रत्येक तालुक्यात आधुनिक, डिजिटल शिक्षणाची नवी पहाट

**बीड । प्रतिनिधी**

**केंद्र सरकारच्या 'पीएम श्री (झच् डक्लख)' आणि राज्य सरकारच्या 'आदर्श शाळा या महत्त्वाकांक्षी योजनेंतर्गत महाराष्ट्रातील ५१६ शाळांची पहिल्या टप्प्यात निवड करण्यात आली आहे. या योजनेत बीड जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यातील निवडक जिल्हा परिषद व केंद्र सरकारच्या शाळांचा समावेश झाल्याने ग्रामीण शिक्षणाला नवी दिशा मिळणार आहे.**




या योजनेंतर्गत निवड झालेल्या शाळांमध्ये स्मार्ट क्लासरूम, डिजिटल शिक्षण, आधुनिक विज्ञान प्रयोगशाळा, संगणक सुविधा, क्रीडा साहित्य, ग्रंथालय, कौशल्याधारित शिक्षण आणि विद्यार्थीकेंद्रित अध्यापन यावर विशेष भर दिला जाणार आहे. यामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षणाच्या नव्या संधी उपलब्ध होणार आहेत.

जिल्ह्यातील प्रमुख पीएम श्री शाळा

पीएम श्री जवाहर नवोदय विद्यालय, गडही (ता. गेवराई) ही जिल्ह्यातील केंद्र सरकारची प्रमुख निवासी शाळा असून येथे डिजिटल वर्गखोल्या, आधुनिक प्रयोगशाळा आणि क्रीडा सुविधा उपलब्ध आहेत.

तालुकानिहाय निवडक शाळा...

बीड : जि. प. केंद्रीय प्राथमिक शाळा, धोंडीपुरा

गेवराई : जि. प. प्राथमिक शाळा, राजणी/गडही परिसर

माजलगाव : जि. प. केंद्रीय प्राथमिक शाळा, माजलगाव ग्रामीण

परळी : जि. प. प्राथमिक शाळा, टीपीएस कॉलनी परिसर

अंबाजोगाई : जि. प. शाळा, जोगाईवाडी परिसर

धारूर : जि. प. प्राथमिक शाळा, घुमट किल्ला परिसर

वडवणी : जि. प. शाळा, वडवणी केंद्र

आष्टी : जि. प. प्राथमिक शाळा, आष्टी केंद्र

ग्रामीण शिक्षणाला नवी दिशा...

'पीएम श्री' आणि 'आदर्श शाळा' योजनांमुळे जिल्ह्यातील शाळांचा शैक्षणिक दर्जा उंचावण्यास मोठी मदत होणार आहे. आधुनिक तंत्रज्ञान, गुणवत्तापूर्ण अध्यापन आणि सर्वांगीण विकासाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना स्पर्धात्मक युगासाठी सक्षम बनविण्याचा या योजनेचा उद्देश आहे.

महाराष्ट्रातील ५१६ शाळांची पहिल्या टप्प्यात निवड.बीड जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यातील निवडक शाळांचा समावेश.स्मार्ट क्लासरूम, डिजिटल शिक्षण, प्रयोगशाळा व आधुनिक सुविधा उपलब्ध होणार.ग्रामीण विद्यार्थ्यांना दर्जेदार व तंत्रज्ञानाधारित शिक्षणाची संधी. शिक्षणाच्या गुणवत्तेत वाढ करून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला चालना मिळणार.

# सलग २७ वर्षांपासून वाढदिवशी रक्तदान

## निलेशकुमार राठौर यांचा प्रेरणादायी उपक्रम



बीड । प्रतिनिधी

वाढदिवस मोठ्या उत्साहात साजरा करण्याची प्रथा असताना, सामाजिक बांधिलकी जपत निलेशकुमार राठौर यांनी यंदाही शासकीय रुग्णालय, बीड येथे रक्तदान करून आपला वाढदिवस साजरा केला. विशेष म्हणजे, त्यांनी आतापर्यंत सलग २७ वेळा रक्तदान करून समाजापुढे प्रेरणादायी आदर्श निर्माण केला आहे.

करू या दान रक्ताचे, फेडू या ऋण समाजाचे या भावनेतून ते दरवर्षी वाढदिवशी रक्तदान करतात. यावेळी बोलताना त्यांनी, प्रत्येकाने किमान वर्षातून एकदा तरी वाढदिवसानिमित्त रक्तदान करून गरजू रुग्णांना जीवनदान देण्याचे आवाहन केले. रक्त कोणत्याही कारखान्यात तयार होत नाही. गरजेच्या वेळी माणसानेच माणसाला रक्त द्यावे लागते. त्यामुळे रक्तदान हेच श्रेष्ठ दान आहे, असे त्यांनी सांगितले.

बलभीम महाविद्यालयात वरिष्ठ अध्यापक म्हणून कार्यरत असताना त्यांनी वाणिज्य विभागाच्या माध्यमातून रक्तदान शिबिराचे आयोजन करून अनेक विद्यार्थ्यांना रक्तदानासाठी प्रेरित केले होते. या सामाजिक कार्याबद्दल महाविद्यालयाकडून त्यांचा सत्कारही करण्यात आला होता.

त्यांच्या या सेवाभावी उपक्रमाबद्दल व्दा. म. ना. सहकारी बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मोमीन साहेब, सोनी साहेब, मुख्य शाखा व्यवस्थापक काळे साहेब, बँकेचे अधिकारी व कर्मचारी, जिल्हा शल्यचिकित्सक तथा रक्त संक्रमण अधिकारी डॉ. अंजली नाईकवाडे, गायकवाड मामा तसेच महाराष्ट्र प्रांतीय राठोड क्षत्रिय समाज (ट्रस्ट) पदाधिकारी आणि मित्रपरिवार यांनी त्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# दैनिक समर्थ राजयोगच्या रोखठोक पत्रकारितेचे मंत्री पंकजाताई मुंडे यांच्याकडून कौतुक

## बारकाईने वृत्तपत्राचे वाचन, निर्भीड लिखाणाची केली प्रशंसा




बीड । प्रतिनिधी

राज्याच्या ग्रामविकास व महिला-बालविकास मंत्री पंकजाताई मुंडे यांनी दैनिक समर्थ राजयोगच्या अंकाचे बारकाईने वाचन करत वृत्तपत्राच्या निर्भीड, रोखठोक आणि जनहितवादी पत्रकारितेचे मनापासून कौतुक केले. समाजातील विविध प्रश्नांना न्याय देणारे, सर्वसामान्यांच्या समस्या प्रभावीपणे मांडणारे तसेच वस्तुनिष्ठ आणि धाडसी वृत्तांकन करणारे दैनिक समर्थ राजयोग हे वाचकांच्या विश्वासास पात्र ठरत असल्याचे त्यांनी यावेळी नमूद केले.

कार्यक्रमा दरम्यान पंकजाताई मुंडे यांनी दैनिक समर्थ राजयोगचा अंक हातात घेऊन त्यातील विविध बातम्या आणि मांडणीचे बारकाईने अवलोकन केले.संपादक वैभव स्वामी यांनी वृत्तपत्रातील सामाजिक, शैक्षणिक, कृषी, राजकीय तसेच जनहिताच्या विषयांवर केलेल्या स्पष्ट आणि परखड लिखाणाचे त्यांनी विशेष कौतुक केले.

यावेळी दैनिक समर्थ राजयोगचे उपसंपादक अमोल कापसे (गेवराई) यांनी पंकजाताई मुंडे यांची भेट घेऊन वृत्तपत्राच्या कार्याची माहिती दिली. त्यांनी दैनिकाच्या माध्यमातून समाजातील प्रश्नांना सातत्याने वाचा फोडण्याचा संकल्प व्यक्त केला. त्यावर पंकजाताई मुंडे यांनी अशाच निर्भीड आणि लोकाभिमुख पत्रकारितेची परंपरा कायम ठेवण्याच्या शुभेच्छा दिल्या.

या प्रसंगी विविध क्षेत्रातील मान्यवर, पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच उपस्थित नागरिकांनी दैनिक समर्थ राजयोगच्या कार्याचे कौतुक केले. पत्रकारितेतील निःपक्षपाती भूमिका, सत्याला प्राधान्य देणारे वृत्तांकन आणि लोकहिताला केंद्रस्थानी ठेवणारी संपादकीय भूमिका यामुळे दैनिक समर्थ राजयोगने अल्पावधीतच वाचकांच्या मनात विश्वासार्ह स्थान निर्माण केल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

# चिंचोटी तलाठी कार्यालय की कायम कुलूपबंद केंद्र.?

## अधिकारी गैरहजर, नागरिकांचा संताप, महसूल प्रशासनावर प्रश्नचिन्ह.?







वडवणी । शंकर झाडे

शासनाने लाखो रुपयांचा खर्च करून उभारलेले चिंचोटी येथील तलाठी कार्यालय नागरिकांच्या सेवेसाठी आहे की कायम कुलूपबंद ठेवण्यासाठी, असा संतप्त सवाल शेतकरी व ग्रामस्थ उपस्थित करत आहेत. कार्यालयीन वेळेत संबंधित तलाठी वारंवार अनुपस्थित राहत असल्याचा आरोप होत असून, महसूल विभागाच्या कार्यपद्धतीबाबत नाराजी व्यक्त केली जात आहे.

सातबारा उतारा, फेरफार, वारस नोंद, उत्पन्न व रहिवासी दाखले आदी कामांसाठी नागरिक दररोज कार्यालयात येतात. मात्र, अधिकारी वेळेत उपलब्ध नसल्याने तासन्तास प्रतीक्षा करून अनेकांना रिकाम्या हाताने परतावे लागत असल्याची तक्रार आहे. त्यामुळे शेतकऱ्यांचा वेळ, पैसा आणि श्रम वाया जात असल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे.

नागरिकांना जलद सेवा मिळावी म्हणून आधुनिक कार्यालये उभारण्यात आली आहेत. मात्र, अधिकारीच वेळेचे पालन करत नसतील तर या सुविधांचा उपयोग काय, असा प्रश्न उपस्थित होत आहे. संबंधित तलाठी यांच्या उपस्थितीची नोंद व कामकाजाची चौकशी करून दोषी आढळल्यास कठोर कारवाई करावी, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे.

'महिना-महिना सज्जवर येत नाहीत' - ग्रामस्थांचा आरोप

ग्रामस्थ अर्जुन गोंडे यांनी आरोप केला की, आमच्या सज्जच्या तलाठी मॅडम अनेकदा महिनोनमहिने सज्जवर येत नाहीत. फोन केल्यावर 'सुट्टीवर आहे', 'चार्ज दुसऱ्याकडे आहे', 'गावी आहे' किंवा 'ऑफिसच्या कामासाठी बाहेर आहे' अशी उत्तरे दिली जातात. त्यामुळे त्यांच्या कामकाजाची चौकशी होणे आवश्यक आहे.

'आठवड्यातून तीन दिवस सज्जसाठी नियोजन' - तहसीलदार

वडवणीचे तहसीलदार वैभव महींद्रकर म्हणाले, संबंधित तलाठी यांचे आठवड्यातून तीन दिवस सज्जसाठी नियोजन आहे. इतर कार्यालयीन कामांमुळे काहीवेळा उपस्थित राहणे शक्य झाले नसेल. याबाबत त्यांच्याशी चर्चा करणार आहे.

'लेखी तक्रार करा, चौकशी करू' - मंडळ अधिकारी

मंडळ अधिकारी फुलचंद खाडे यांनी सांगितले, तलाठी कार्यालयाची वेळ सकाळी ९.४५ ते सायंकाळी ६.१५ आहे. नागरिकांनी लेखी तक्रार केल्यास तहसीलदारांच्या आदेशानुसार चौकशी करून अहवाल सादर करण्यात येईल.

ठळक मुद्दे ✻ कार्यालयीन वेळेत तलाठी अनुपस्थित असल्याचा ग्रामस्थांचा आरोप. ✻ सातबारा, फेरफार व दाखल्यांसाठी नागरिकांना वारंवार हेलपाटे.✻ उपस्थितीची चौकशी करून जबाबदारी निश्चित करण्याची मागणी.✻ तहसीलदार व मंडळ अधिकाऱ्यांचे चौकशीचे आश्वासन.

# पत्नीच्या निघृण खुनाप्रकरणी पतीला जन्मठेप बीड सत्र न्यायालयाचा महत्त्वपूर्ण निकाल

बीड /प्रतिनिधी

पत्नीच्या चारित्र्यावर संशय घेऊन तिची निघृण हत्या करणाऱ्या पतीस बीड येथील जिल्हा व सत्र न्यायालयाने जन्मठेपेची शिक्षा सुनावत न्यायव्यवस्थेवरील विश्वास अधिक दृढ केला आहे. मा. जिल्हा व सत्र न्यायाधीश श्री. दिनेश पी. सुराणा यांनी आरोपीस जन्मठेप व २५,००० दंड, तसेच दंड न भरल्यास सहा महिन्यांची अतिरिक्त सक्तमजुरी अशी शिक्षा सुनावली.

सदर प्रकरणातील आरोपी शरामत ऊर्फ समीर कादर शेख (रा. अखेरवाडा, ता. पैठण) हा आपल्या पत्नी शबाना हिच्या चारित्र्यावर संशय घेत होता. दिनांक २५ ऑगस्ट २०२३ रोजी मध्यरात्री चकलांबा येथील अंबिरबाबा दर्गा येथे मुक्कामी असताना आरोपीने झोपेत असलेल्या पत्नीच्या डोक्यावर सुमारे ७.३८० किलो वजनाचा मोठा दगड टाकून तिची निघृण हत्या केली. या घटनेप्रकरणी चकलांबा पोलीस ठाणे येथे गुन्हा रजिस्टर क्रमांक २४०/२०२३ अन्वये भारतीय दंड संहिता कलम ३०२ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता.

या खटल्याचे वैशिष्ट्य म्हणजे संपूर्ण खटला परिस्थितीजन्य पुरावे, वैज्ञानिक तपास आणि वैद्यकीय पुराव्यांवर आधारित होता. सरकारी पक्षातर्फे ॲड. ए. डी. राख यांनी प्रभावी युक्तिवाद करत न्यायालयासमोर सर्व पुरावे सुसंगतपणे मांडले. या खटल्यात एकूण ११ साक्षीदारांची साक्ष नोंदविण्यात आली.सुनावणी दरम्यान आरोपीने मानसिक आजाराचा बचाव मांडण्याचा प्रयत्न केला; मात्र त्यास कोणताही ठोस पुरावा नसल्याने न्यायालयाने तो फेटाळून लावला. उपलब्ध पुरावे, परिस्थितीजन्य घटनाक्रम व वैज्ञानिक विश्लेषणाच्या आधारे हा मृत्यू अपघाती नसून पूर्वनियोजित खून असल्याचे न्यायालयाने स्पष्टपणे नमूद केले.या गुन्ह्याचा तपास चकलांबा पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक श्री. नारायण एकशिंगे यांनी अत्यंत बारकाईने, शास्त्रशुद्ध व परिणामकारक पद्धतीने पूर्ण केला.

सदर प्रकरणात दोषसिद्धी मिळविण्यासाठी पोलीस अधीक्षक, बीड श्री. नवनीत कावत व अपर पोलीस अधीक्षक श्री. समीर शेख यांच्या मार्गदर्शनाखाली दोषसिद्धी कक्ष, बीड येथील प्रभारी अधिकारी सपोनि ज्ञानेश्वर थोरात, पोलीस हवालदार श्रीकांत पाखरे, मपोह नागरगोजे, मपोह खाडे, मपोशि नागरगोजे तसेच चकलांबा पोलीस ठाण्यातील मपोशि उर्मिला माने यांनी सातत्यपूर्ण परिश्रम घेऊन प्रकरणाची प्रभावीपणे पैरवी केली.

या प्रकरणातील दोषसिद्धी ही बीड पोलिसांनी केलेल्या शास्त्रशुद्ध, वैज्ञानिक, वस्तुनिष्ठ व परिणामकारक तपासाची ठोस पावती आहे. गंभीर स्वरुपाच्या गुन्ह्यांमध्ये भक्कम पुरावे संकलित करून न्यायालयात प्रभावी मांडणी केल्यास निश्चित दोषसिद्धी मिळू शकते, याचे हे उत्कृष्ट उदाहरण आहे.

बीड पोलीस नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी तसेच गंभीर गुन्ह्यांतील आरोपींना कायद्यानुसार कठोर शिक्षा मिळवून देण्यासाठी सदैव कटिबद्ध असून, अशा प्रकारच्या गुन्ह्यांविरुद्ध 'शून्य सहनशीलता' धोरणाने कार्यरत राहतील, असा विश्वास या निकालामुळे अधिक दृढ झाला आहे.

# वारीत आरोग्यसेवेचा विठ्ठलनामाचा संकल्प.!



**जिजामाता कॉलेज ऑफ फिजिओथेरपीकडून वारकऱ्यांसाठी मोफत आरोग्य व औषधोपचार शिबिर**

माजलगाव । प्रतिनिधी

आषाढी वारीनिमित्त पंढरपूरकडे जाणाऱ्या वारकऱ्यांसाठी माजलगाव येथील मंगलनाथ मंदिर परिसरात जिजामाता कॉलेज ऑफ फिजिओथेरपीच्या वतीने मोफत आरोग्य तपासणी व औषधोपचार शिबिर घेण्यात आले.

माजलगाव विकास प्रतिष्ठानच्या अध्यक्षा सौ. मंगलाताई प्रकाश सोळंके यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या या शिबिरात वारकऱ्यांची रक्तदाब, पायांची व सर्वसाधारण आरोग्य तपासणी करण्यात आली. तसेच पायांचे दुखणे, सूज, स्नायूंचा थकवा आदी समस्यांवर मोफत उपचार व योग्य पाऊल निगेबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

प्राचार्य डॉ. पॉलराज यांनी, वारीत पायांची काळजी घेणे म्हणजेच खरी विठ्ठलसेवा, असा संदेश दिला.यावेळी डॉ. ज्ञानेश्वर गिलबिले, सुभाष बप्पा सोळंके, भगवान शेजुळ, ज्ञानेश्वर जाधव, उपप्राचार्य डॉ. सिमुलिया डिन्जू, डॉ. हरिप्रिया, डॉ. सुमित आनंदगावकर, डॉ. वीरा, डॉ. प्रशांत राऊत, इरफान पठाण यांच्यासह शिक्षक, कर्मचारी व विद्यार्थ्यांनी वारकऱ्यांची सेवाभावाने सेवा केली.एक पाऊल विठ्ठलाकडे... एक पाऊल आरोग्याकडे या संदेशाने शिबिराची सांगता झाली.

हे पत्रक मालक,मुद्रक,प्रकाशक,संपादक वैभव विवेक स्वामी यांनी इंद्रधनुष्य प्रिंटिंग ॲण्ड पब्लिशर्स,सावता माळी चौक,मोंढा रोड,बीड,जिल्हा बीड येथे छापून दैनिक समर्थ राजयोग कार्यालय,छत्रपती कॉलनी,तहसील बॅक साईड,क्रांती नगर, बीड,जिल्हा बीड - ४३ ११ २२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER, EDITOR VAIBHAV VIVEK SWAMI AT ENDRADHANUSHYA PRINTING AND PUBLISHERS, SAVATA MALI CHOWK, MONDHA ROAD, BEED. DIST. BEED AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAINIK SAMARTH RAJYOG, CHATRAPATI COLONY, TAHASHIL BACK SIDE, KRANTI NAGAR, BEED, DIST. BEED-431122 ( MAHARSHTRA ).

# दुग्ध व्यवसायाला प्रधान व्यवसायाचे स्थान द्या;महाराष्ट्र देशातील सर्वोत्तम दूध उत्पादक प्रदेश-आ.सुरेश धस

## २० ते ३० गाईंच्या शास्त्रोक्त व्यवस्थापनातून जिल्हाधिकाऱ्यांच्या वेतनाइतके उत्पन्न शक्य-संदीप सिंग

महाराष्ट्रही दूध उत्पादनात पंजाबच्या बरोबरीने पुढे जाऊ शकतो-हरप्रीत सिंग

आष्टी - (एस.राजेंद्र लाड) महाराष्ट्र राज्याची भौगोलिक, नैसर्गिक परिस्थिती आणि कष्टकरी शेतकरी यांच्यामुळे महाराष्ट्र राज्य हे दूध उत्पादन व्यवसायासाठी देशात सर्वोत्तम प्रदेश आहे. त्यामुळे युवकांनी दूध उत्पादन हा पूरक व्यवसाय न समजता शेती पेक्षा प्रधान व्यवसाय समजून नियोजनबद्ध पद्धतीने दुग्ध व्यवसाय करावा असे प्रतिपादन आ. सुरेश धस यांनी केले.

तर वीस, तीस गाईंचे शास्त्रोक्त पद्धतीने संगोपन करताना त्यांची लागवड, खाद्य खुराक आणि गोठ्याचे व्यवस्थापन केल्यास जिल्हाधिकारी दर्जाच्या अधिकाऱ्यांच्या वेतनाइतके आर्थिक उत्पन्न मिळू शकते असे प्रतिपादन पंजाब येथील प्रसिद्ध दुग्ध व्यवसायिक संदीप सिंग यांनी केले तर नियोजनबद्ध दुग्ध व्यवसाय केल्यास आपल्या पुढच्या पिढ्यांसाठी तरतूद करता येईल असे प्रतिपादन हरप्रीत सिंग यांनी केले. आष्टी येथील आष्टी तालुका दूध उत्पादक व पुरवठा सहकारी संघ यांचे वतीने दुग्ध उत्पादन वाढीविषयी मार्गदर्शन मेळाव्यामध्ये ते बोलत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आ. सुरेश (आण्णा) धस होते. यावेळी व्यासपीठावर आ. सुरेश (आण्णा) धस, पंजाबचे डेअरी तज्ज्ञ हरप्रीत सिंग, संदीप सिंग, वामन (दादा) गायकवाड, आष्टी तालुका दूध उत्पादक व पुरवठा सहकारी संघाचे चेअरमन शांतीलाल भोसले, तानाजी हैदर, हनुमंत पंच, गणेश अंतरे (सोनगाव, ता. राहुरी), रामनाथ बदक (संगमनेर), प्रोग्रेसिव्ह बिल्डर फार्मर्स असोसिएशन महाराष्ट्राचे सचिव जयवंत ताकणे, आधुनिक दुग्ध व्यवसाय तज्ज्ञ भरत (काका) गळभोर, आष्टी तालुका दूध उत्पादक व पुरवठा सहकारी संघाचे संचालक, पदाधिकारी व मान्यवर उपस्थित होते.

यावेळी बोलताना आ. सुरेश धस म्हणाले की, महाराष्ट्र राज्याची भौगोलिक नैसर्गिक परिस्थिती आणि कष्टकरी शेतकरी यांच्यामुळे संपूर्ण देशामध्ये महाराष्ट्र राज्य हा सर्वोत्तम प्रदेश असल्यामुळे महाराष्ट्रातील युवक शेतकऱ्यांनी शेती हा प्रथम व्यवसाय न समजता दुग्ध व्यवसाय हा प्रथम व्यवसाय समजावा. चांगल्या









शेतकऱ्यांनी दूध उत्पादनाकडे वळावे आणि दुसऱ्या शेतकऱ्यांना देखील चांगले सांगावे आपापसात सहकार्य करावे दूध व्यवसाय सुरू करताना लागवडीसाठी दर्जेदार असलेले डब्ल्यू डब्ल्यू एस, एबीएस आरमाडा, ऑस्कर, रॅन्लर हे सेक्स सॉर्टेड सिमेन म्हणजे केवळ कालवडी जन्मतील असे सिमेन वापरावे याबाबत दूध उत्पादकांनी अत्यंत जागृत राहून दर्जेदार सिमेन वापरावे. गाईंचे लागवडीपासून प्रसूतीपर्यंत खाद्याचे खुराक प्रोटीन मिनरल मिक्स्चर याबाबतचे मार्गदर्शन घेऊन चांगल्या कालवडीची निर्मिती करावी अशा पद्धतीने आज गाय २० लिटर दूध देत असेल तर होणारी कालवड ही २५ ते ३० लिटर दूध देऊ शकते. संदीप सिंग आणि हरप्रीत सिंग या बंधूंनी अतिशय शून्यातून दुग्ध व्यवसाय सुरू केला असून या व्यवसायात त्यांनी मोठी झेप घेतली आहे त्यांच्या मार्गदर्शनाखाली आष्टी तालुक्यातील दूध उत्पादकांनी दूर व्यवसायासाठी वाढीसाठी मार्गदर्शन घ्यावे. आष्टी तालुका दूध उत्पादक व पुरवठा सहकारी संघ त्यासाठी सदैव तयार आहे. चांगल्या दर्जेदार गाई निर्मिती झाल्यानंतर पुढील काही दिवसांमध्ये दुग्ध व्यवसायाला अतिशय चांगले दिवस येणार असून गाईंची किंमत वाढणार आहे आणि दुधाची देखील किंमत वाढणार आहे. त्यामुळे युवक शेतकऱ्यांनी शेती हा प्रथम व्यवसाय न समजता दुग्ध व्यवसाय हा प्रथम समजावा असे प्रतिपादन त्यांनी महाराष्ट्र राज्यामध्ये सर्वच दूध उत्पादक हे भेसळ करत नसून काही निर्लज्ज भामटे दूध भेसळीची भडवेगिरी करत आहेत. हे दूध व्यवसायासाठी अत्यंत धोकादायक असून अन्न व औषधी विभागाचे आयुक्त पदी कारभार स्वीकारल्यानंतर तुकाराम मुंढे यांनी या दूध भेसळीविरुद्ध कठोर कारवाई केली, त्याबद्दल त्यांची कामगिरी अभिनंदनीय आहे असे त्यांनी शेवटी सांगितले.

संदीप सिंग यावेळी बोलताना म्हणाले की, गाईंच्या आवश्यकतेनुसार त्यांना खाद्य पुरवावे, शक्यतो दहा दिवसाच्या अगोदरचे पशुखाद्य हे बुरशी आल्यामुळे मारक ठरू शकते, अनेक पशुखाद्य कंपन्या या युरियाचा वापर करत आहेत, त्यामुळे गाईंच्या आरोग्यासाठी धोका असल्यामुळे त्यापासून दूध उत्पादकांनी काळजी घेणे आवश्यक आहे. आपण तयार करत असलेल्या कालवडी गाई यांचे पासून ०५ ते ०६ वेत मिळवायचे असून मुरघास हा चांगल्या पद्धतीने तयार केल्यास ९०% फायदा होतो. दूध उत्पादकांनी सामूहिक पद्धतीने आपापले अनुभव शेअर करून एकमेकांना मदत केली पाहिजे, सध्या बाजारात ३५ टक्के दूध हे नकली असल्यामुळे गंभीर परिस्थिती आहे. २०,३० गाईंपासून चांगल्या पद्धतीने ब्रीडिंग फीडिंग आणि गोठ्याचे मॅनेजमेंट केल्यास जिल्हाधिकारी इतक्या पगाराचे आर्थिक नियोजन होऊ शकते. त्यामुळे युवक शेतकऱ्यांनी या व्यवसायाकडे पाहावे, केवळ पंजाबच नव्हे तर महाराष्ट्रात देखील दूध उत्पादनास चांगला वाव असल्याचे त्यांनी शेवटी सांगितले.

यावेळी बोलताना हरप्रीत सिंग म्हणाले की, देशात दूध उत्पादनामध्ये स्पर्धा निर्माण झाली असून सहकारी संस्थांद्वारे डेरी फार्मिंग ही तामिळनाडू, पंजाब, महाराष्ट्र, कर्नाटक, आंध्र प्रदेश या राज्यांमध्ये अतिशय चांगल्या पद्धतीने सुरू असून दूध व्यवसाय हा उत्तम अत्याधुनिक पद्धतीने केला पाहिजे. पारंपारिक पद्धतीचे गोठे आता बंद केले पाहिजे. व्ही टाईप गोठे तयार करून त्यातून उष्णता आणि वायू बाहेर पडला पाहिजे. गोठ्याची स्वच्छता हा सर्वात मोठा घटक असून गाईचा खुराक हा अत्यंत शास्त्रज्ञ पद्धतीने दिला पाहिजे, गाईच्या मर्जीनुसार खाद्य दिले पाहिजे, गाईच्या लागवडीसाठी ब्रीडिंग फीडिंग आणि मॅनेजमेंट नुसार व्यवस्थापन केल्यास एका गाईपासून दहा महिन्यांमध्ये ४ लाख ७३ हजार रुपये किंमतीचे दूध तयार होते हे आम्ही सिद्ध केले असून मुरघास स्टार्च हे पीठ तयार करून दिले पाहिजे तसेच गाय ही १२ तास बसून राहिली पाहिजे, तिच्या रवंथ करण्यामुळे दूध उत्पादनात वाढ होत असून माणूस आपल्या गरजांची जशी पूर्तता करतो त्याच पद्धतीने गाईंचे गरजाची पूर्तता केल्यास गाईपासून आर्थिक उत्पन्न निर्माण करून आपली गरज भागवली जाते असे अनुभवास येत आहे असे सांगत ९० टक्के शेतकऱ्यांना दूध व्यवसायाचा शास्त्रोक्त पद्धतीने अभ्यास नसल्यामुळे थोड्या परिश्रमातून शास्त्रोक्त पद्धतीने आम्ही केलेल्या कामाचे व्हिडिओ पाहून शेतकऱ्यांनी दूध उत्पादन वाढवावे कारण दूध हा अत्यंत आवश्यक पदार्थ असून जगावर कितीही संकट आले तरी दूध हे मानवी जीवनातला सर्वात मोठा अन्नघटक आहे हे आपण कोविड-१९ काळात देखील अनुभवले आहे असे सांगत ते पुढे म्हणाले की, संदीप सिंग आणि आपण शून्यातून दूध व्यवसाय निर्माण केला असून सन २०१६ मध्ये ०३ गाई त्याही प्रत्येकी १५ लिटरच्या असलेल्या अशा गाईंपासून व्यवसायाची सुरुवात केली आहे. आज ४.०० कोटी रुपये चा व्यवहार होत आहे. महाराष्ट्र राज्य उत्पादनामध्ये दुसरा पंजाब होऊ शकतो असे त्यांनी शेवटी सांगितले.



# श्री क्षेत्र केळसांगवी ते पंढरपूर पायी दिंडी सोहळ्याचे आज प्रस्थान

आष्टी - (एस.राजेंद्र लाड) आष्टी तालुक्यातील श्री क्षेत्र केळसांगवी येथील विठ्ठल मंदिर संस्थान येथून पंढरपूरसाठी निघणाऱ्या आषाढी पायी दिंडी सोहळ्याचे यंदाचे १७ वे. वर्ष आहे. हा सोहळा आज गुरुवार दि. १६ जुलै २०२६ रोजी सकाळी ७ वाजता विठ्ठल मंदिर परिसर, केळसांगवी येथून पंढरपूरकडे मार्गस्थ होणार आहे. दिंडी चालक संत नामधारक ह.भ.प. आसाराम महाराज (केळसांगवीकर) यांच्या मार्गदर्शनाखाली हा भव्य सोहळा संपन्न होत आहे.

परिसरातील भाविकांनी या दिंडी सोहळ्याचा लाभ घ्यावा असे आवाहन संत नामधारक वैराग्यमूर्ती आसाराम महाराज केळसांगवीकर व समस्त ग्रामस्थ मंडळी केळसांगवी यांच्या वतीने करण्यात आले आहे. १६ जुलै ते २९ जुलै या कालावधीत चालणाऱ्या या पायी दिंडीचा दैनंदिन मार्ग, नाश्ता, दुपारचे जेवण आणि मुक्कामाचे नियोजन झालेले आहे. पिंपरी, रुटी, खानापूर, टाकळसिंग, खडकत, तरडगाव, डाकू निमगाव, चापडगाव, मांगी, पांडे, गुळसडी, वरकटने, पाटील मळा, निंभोरे, वडशिवणे, कनेरगाव, टेंभुर्णी एमआयडीसी, परिते, करकंब, भोसे ते पंढरपूर असा मार्ग आहे.

श्री. अण्णासाहेब भानुदास चौधरी यांच्या वतीने काल्याचे किर्तन व महापंगत होणार आहे. बुधवार, दिनांक २९ जुलै २०२६ रोजी श्री. बबनराव साहेबराव पडोळे व श्री. रामदास करगुटकर यांच्या तर्फे काल्याचा महाप्रसाद होईल व त्यानंतर दिंडी सोहळ्याची अधिकृत सांगता होईल.

दिंडीचा पंढरपूर येथील मुक्काम बेडगे वस्ती, (गुरसाळे) आसाराम महाराज नामधारक मठ, करकम-पंढरपूर रोड, पंढरपूर येथे असणार आहे. दिंडी प्रदक्षिणा एकादशी दिवशी रात्री ३ वाजता वाजत-गाजत निघणार असून, दिंडीत शिस्त व व्यसनमुक्तीचे कडक नियम पाळण्याचे आवाहन संयोजन समितीने केले आहे.

# रिचा केअर्स फाउंडेशनचा भवरवाडीतील विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी उपक्रम

## शालेय साहित्य,कॅलिग्राफी व रांगोळी साहित्याचे मोफत वाटप

आष्टी (एस. राजेंद्र लाड) ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला चालना देण्याच्या उद्देशाने रिचा केअर्स फाउंडेशनच्या वतीने जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, भवरवाडी येथे शालेय साहित्य, कॅलिग्राफी साहित्य आणि रांगोळी साहित्याचे मोफत वाटप करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या शिक्षणाला हातभार लावण्याबरोबरच सुंदर हस्ताक्षराची जडणघडण आणि सर्जनशीलतेला प्रोत्साहन देणारा हा उपक्रम उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.

या उपक्रमामागे रिचा केअर्स फाउंडेशनच्या लीडर सौ. रिचा पाठक पुरोहित यांची दूरदृष्टी, सामाजिक बांधिलकी आणि प्रेरणादायी मार्गदर्शन लाभले. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शैक्षणिकदृष्ट्या सक्षम करण्याच्या उद्देशाने त्यांनी या उपक्रमाला मोलाचा पाठिंबा दिला. विद्यार्थ्यांना आवश्यक शैक्षणिक साहित्य उपलब्ध करून देतानाच त्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासालाही चालना मिळावी, हा या उपक्रमामागील प्रमुख हेतू होता.

कार्यक्रमाचे नियोजन आणि आयोजन सौरभ खंडागळे, हरेश लासे,



भावेश सुतार आणि चंद्रकांत निकम यांनी अत्यंत नियोजनबद्ध पद्धतीने केले. त्यांच्या परिश्रमामुळे कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पडला.

यावेळी विद्यार्थ्यांना दप्तर, पाऊच, रेनकोट, कंपास बॉक्स, कॅलिग्राफी पेनचे दोन संच, रांगोळी किट तसेच विविध रांगोळी साहित्य मोफत वितरित करण्यात आले. विशेष म्हणजे विद्यार्थ्यांमध्ये सुंदर हस्ताक्षराची आवड निर्माण व्हावी, कॅलिग्राफी कौशल्य विकसित व्हावे आणि रांगोळीच्या माध्यमातून त्यांच्या कलागुणांना वाव मिळावा, या उद्देशाने कॅलिग्राफी साहित्य आणि रांगोळी किटचेही वितरण करण्यात आले. या साहित्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये मोठा उत्साह संचारला असून त्यांनी आनंदाने या उपक्रमाचा लाभ घेतला.

या कार्यक्रमाला केंद्रप्रमुख श्री. प्रवीण मेहेरकर, गावचे सरपंच, शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षकवृंद, ग्रामस्थ, पालक आणि अन्य मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थितांनी रिचा केअर्स फाउंडेशनच्या सामाजिक कार्याचे कौतुक करत ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी अशा प्रकारचे उपक्रम सातत्याने राबविण्याची अपेक्षा व्यक्त केली.

यावेळी मान्यवरांनी विद्यार्थ्यांना नियमित अभ्यास, शिस्त, स्वच्छता, सुंदर हस्ताक्षर आणि सर्जनशील उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घेण्याचे आवाहन केले. सुंदर अक्षर ही विद्यार्थ्यांची खरी ओळख ठरते, तर रांगोळीमुळे कला, संयम, कल्पकता आणि सौंदर्यदृष्टी विकसित होते, असे मार्गदर्शनही त्यांनी केले.

या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना केवळ शालेय साहित्यच नव्हे, तर आत्मविश्वास, प्रेरणा आणि शिक्षणाबद्दलचा नवा उत्साहही मिळाला. सामाजिक बांधिलकी जपत ग्रामीण भागातील शिक्षणाच्या उन्नतीसाठी रिचा केअर्स फाउंडेशन सातत्याने कार्यरत असून भवरवाडीतील हा उपक्रम त्याचे उत्कृष्ट उदाहरण ठरला आहे.

विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शिक्षण, संस्कार, सुंदर हस्ताक्षर आणि कलागुणांचा विकास या चारही बाबींना समान महत्त्व देणारा हा उपक्रम निश्चितच प्रेरणादायी ठरला असून, भवरवाडी परिसरासह संपूर्ण आष्टी तालुक्यात या समाजोपयोगी उपक्रमाचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.

# जनसेवेचा गौरव सेवानिवृत्त पोलीस अधिकारी भाऊसाहेब सहाणे यांचा ब्रह्मकुमारींकडून सन्मान

## शाल,पुष्पगुच्छ व सन्मानचिन्ह देऊन गौरव आध्यात्मिक वातावरणात सत्कार सोहळा उत्साहात संपन्न

भोकरदन इसरारखान पठाण :-

पोलीस विभागात दीर्घकाळ प्रामाणिकपणे निष्ठेने आणि निस्वार्थ भावनेने सेवा बजावून सेवानिवृत्त झालेले पोलीस अधिकारी भाऊसाहेब सहाणे यांचा प्रजापिता ब्रह्मकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय जालना यांच्या वतीने भावपूर्ण सत्कार करण्यात आला. हा सोहळा आध्यात्मिक स्नेहपूर्ण आणि उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.पोलीस सेवेत कार्यरत असताना भाऊसाहेब सहाणे यांनी जनतेची सुरक्षा कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी उल्लेखनीय योगदान दिले. त्यांच्या प्रदीर्घ आणि समर्पित जनसेवेचा गौरव करण्यासाठी आयोजित या कार्यक्रमात मान्यवरांच्या हस्ते त्यांना शाल, पुष्पगुच्छ आणि सन्मानचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी केक कापून त्यांच्या निरोगी आनंदी आणि दीर्घायुषी जीवनासाठी शुभेच्छाही देण्यात आल्या.

कार्यक्रमात उपस्थित मान्यवरांनी सहाणे यांच्या कर्तव्यनिष्ठ, सेवाभावी आणि लोकाभिमुख कार्याचा गौरव करत त्यांच्या पुढील आयुष्यासाठी उत्तम आरोग्य सुख, समृद्धी आणि



समाजसेवेची अखंड प्रेरणा लाभो अशा सदिच्छा व्यक्त केल्या. सत्कार सोहळ्यात उपस्थितांनी टाळ्यांच्या गजरात त्यांचे अभिनंदन करून त्यांच्या कार्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली.

याप्रसंगी अंबडच्या संचालिका मीरा दिदी,चंद्रकला दिदी, देऊळगाव राजा येथील संचालिका सुनंदा दिदी, देवकला दिदी,टेंभुर्णीच्या शकुंतला दिदी,जाफ्राबादच्या अर्चना दिदी,जालना येथील अर्चना दिदी,परतूरच्या रेखा दिदी,भोकरदनच्या अनिता दिदी,लता दिदी,ऋषी भाई, सुभाष ढाकणे,गंगुबाई, पुंजाबाई,गणेश भाई,कौतुक भाई, देवराव भाई,हरी भाई, उत्तम भाई,अशोक भाई, संजय तळेकर,श्रीकृष्ण भाई, विजय भाई,परमेश्वर भाई यांच्यासह भोकरदन तालुक्यातील तसेच बरंजळा व कुंभारी परिसरातील महिला-पुरुष मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सत्काराला उत्तर देताना भाऊसाहेब सहाणे यांनी सेवानिवृत्तीनंतरही समाजहितासाठी कार्यरत राहण्याचा संकल्प व्यक्त केला. ब्रह्मकुमारी संस्थेच्या या उपक्रमामुळे उपस्थितांमध्ये समाधानाचे आणि प्रेरणादायी वातावरण निर्माण झाले.

# स्वप्नांना विज्ञानाची भरारी बीटीएसमध्ये चमकलेल्या गुणवंतांचा पवन करिअर अकॅडमीत दिमाखदार गौरव

## राज्य जिल्हा व केंद्रस्तरीय यशस्वी विद्यार्थ्यांचा सत्कार इस्रो भेट व विमान प्रवासाची संधी ठरली विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी

अंबड गजानन पुरी :-

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये विज्ञान संशोधन आणि स्पर्धा परीक्षांची आवड निर्माण व्हावी तसेच त्यांची राष्ट्रीय स्तरावर प्रतिभा सिद्ध व्हावी या उद्देशाने एज्यूमीट अकॅडमी आयोजित भारत टॅलेंट सर्च परीक्षेत राज्य, जिल्हा व केंद्रस्तरावर उल्लेखनीय यश संपादन करणाऱ्या विद्यार्थ्यांचा भव्य गुणगौरव सोहळा पवन करिअर अकॅडमी येथे उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.

या सोहळ्याला नवनिर्वाचित पोलीस उपनिरीक्षक संभाजी जाधव पवन करिअर अकॅडमीचे संचालक सुरेश जगताप, दैनिक समर्थ राजयोगचे जिल्हा प्रतिनिधी फारुक शेख तसेच गणेश चव्हाण यांची प्रमुख उपस्थिती लाभली. मान्यवरांच्या हस्ते यशस्वी विद्यार्थ्यांना सन्मानचिन्हे प्रमाणपत्रे व बक्षिसे देऊन गौरविण्यात आले.

कार्यक्रमाची सुरुवात क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून झाली. त्यानंतर उपस्थित मान्यवरांचा शाल,श्रीफळ व पुष्पहार देऊन सत्कार करण्यात आला.यावेळी मार्गदर्शन करताना मान्यवरांनी बीटीएस परीक्षा ही विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन तर्कशक्ती जिज्ञासा आणि संशोधनाची आवड निर्माण करणारे प्रभावी व्यासपीठ असल्याचे सांगितले. या परीक्षेत उत्कृष्ट यश मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांना विमान प्रवासासह इस्रोसारख्या राष्ट्रीय संस्थेला निशुल्क भेट देण्याची संधी मिळत असल्याने विद्यार्थ्यांनी सातत्यपूर्ण अभ्यास मेहनत आणि आत्मविश्वासाच्या जोरावर अशा स्पर्धांमध्ये मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन करण्यात आले.




पोलीस उपनिरीक्षक संभाजी जाधव यांनी आपल्या प्रेरणादायी भाषणात सांगितले की ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये अफाट क्षमता आहे. योग्य मार्गदर्शन चिकाटी आणि आत्मविश्वास यांच्या बळावर ते राष्ट्रीय स्तरावर मोठे यश मिळवू शकतात. बीटीएससारख्या परीक्षा विद्यार्थ्यांच्या बौद्धिक विकासाला चालना देतात. त्यामुळे प्रत्येक विद्यार्थ्याने अशा स्पर्धांमध्ये सहभागी होऊन स्वतःसह आपल्या शाळेचे गावाचे आणि जिल्ह्याचे नाव उज्ज्वल करावे.

यावेळी कु. सावी विनोद वाघाळकर हिने राज्य गुणवत्ता यादीत स्थान मिळवत विमान प्रवासासह इस्रो सहलीसाठी पात्रता मिळविल्याबद्दल विशेष गौरव करण्यात आला. तसेच हर्षवर्धन सूर्यवंशी, दिविजा बुद्रकवाड, कल्याणी वाजे, सोहम बहीर, शौर्य कावळे, वनिता नागलोत यांच्यासह बाचेगाव, हस्तपोखरी, मसई, माळीवाडी, ढालसखेडा, दूधपुरी, वसंतनगर, निहालसिंगवाडी, बारसवाडा, दाढेगाव, रवना, सिद्धेश्वर पिंपळगाव, कुंभार पिंपळगाव व घाणेगाव येथील विद्यार्थ्यांचा स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात आला.

कार्यक्रमाचे प्रभावी सूत्रसंचालन भाऊसाहेब बहीर यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी नितीन रोहोकले, नितीन कोल्हे, दिलीप तौर, गजानन पुरी, संदीप महाडिक, संदीप सातपुते, किरण सानप, महेश मडके, विकासकुमार ढोले, व्यंकटेश सूर्यवंशी, प्रशांत कानडे, शशिकांत कावळे, ज्ञानोबा बुद्रकवाड, संभाजी शिंदे, विकास नागरे, दत्तात्रय शिंदे, शिवाजी बांगर, सय्यद सर, संदीप साबळे, शिवशंकर मोटे, कदम सर, बिरासदार मॅडम, सय्यद मॅडम तसेच सर्व शिक्षकवृंद यांनी विशेष परिश्रम घेतले.शेवटी गजानन पुरी यांनी उपस्थितांचे आभार मानले.

बीटीएसमधून विज्ञानाची नवी वाट

विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेचा सन्मान हा केवळ गौरवाचा क्षण नसून इतर विद्यार्थ्यांसाठी प्रेरणेचा स्रोत ठरतो.बीटीएससारख्या स्पर्धा परीक्षा ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना विज्ञान संशोधन, नवकल्पना आणि राष्ट्रीय स्तरावरील संधींची दारे खुली करून देतात. त्यामुळे प्रत्येक विद्यार्थ्याने अशा स्पर्धांचा लाभ घेत उज्ज्वल भविष्याचा भक्कम पाया रचावा असा प्रेरणादायी संदेश या गुणगौरव सोहळ्यातून देण्यात आला.



# खडगपूरमध्ये प्रवेश आदित्य दराडेचा जालना येथे गौरव

## अप्लाईड जिओलॉजी अभ्यासक्रमासाठी निवड जिद्द मेहनत आणि कुटुंबाच्या पाठबळामुळे यश मान्यवरांचे गौरवोद्गार

जालना प्रतिनिधी :- बदनापूर तालुक्यातील भराडखेडा येथील आदित्य दीपक दराडे याची देशातील प्रतिष्ठित इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी खखढ खडगपूर येथे अप्लाईड जिओलॉजी अभ्यासक्रमासाठी प्रवेश निश्चित झाल्याबद्दल जालना शहरात विविध क्षेत्रांतील मान्यवरांच्या हस्ते त्याचा व दराडे कुटुंबीयांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी बोलताना राजेंद्रजी राख यांनी आदित्यच्या यशामागे पालकांचे योग्य नियोजन, सातत्यपूर्ण प्रयत्न कठोर परिश्रम आणि अभ्यासातील चिकाटी महत्त्वाची ठरल्याचे सांगितले. आदित्यच्या यशातून ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना प्रेरणा मिळेल असा विश्वास व्यक्त करत भगवान सेवा मंडळ व भगवानगड यांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी भविष्यातही सातत्याने पुढाकार घेतला जाईल अशी ग्वाही त्यांनी दिली.शिवसेना जिल्हाप्रमुख भाऊसाहेब घुगे यांनी आपल्या मनोगतात आदित्यने मिळवलेले यश हे त्याची जिद्द, अथक मेहनत अभ्यासातील सातत्य तसेच कुटुंबीयांची प्रेरणा आणि भक्कम पाठबळ यांचे फलित असल्याचे सांगितले. तसेच आदित्य व दराडे कुटुंबीयांनी भराडखेड्यासह जालना जिल्ह्यातील विद्यार्थ्यांना आयआयटीसारख्या राष्ट्रीय स्तरावरील संस्थांमध्ये प्रवेश मिळवण्यासाठी मार्गदर्शन व प्रोत्साहन देण्याची जबाबदारी स्वीकारावी असे आवाहनही त्यांनी केले.

यावेळी मान्यवरांच्या हस्ते आदित्य दराडे यांचा शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ व सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला. उपस्थितांनी त्याच्या पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा देत उज्ज्वल भविष्यासाठी सदिच्छा व्यक्त केल्या.

कार्यक्रमास राजेंद्रजी राख, शिवसेना जिल्हाप्रमुख भाऊसाहेब घुगे, ड. मधुकर सोनवणे, नगरसेवक शशिकांत घुगे, गणेश घुगे, रविंद्रजी हुसे, डॉ. सतीश शेकडे, डॉ. चौरे, जगत घुगे, प्रकाश जायभाय, देवेंद्र बारगजे, महादेवजी आघाव यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते.

# श्री संत मदन महाराज दिंडीचे पंढरपूरकडे भक्तिमय प्रस्थान ;कडा नगरी हरिनामाच्या गजराने दुमदुमली

## वारकऱ्यांसाठी मोफत आरोग्य तपासणी शिबिर; समाजाच्या सुख-समृद्धी व चांगल्या पावसासाठी विठ्ठल चरणी साकडे

आष्टी - (एस.राजेंद्र लाड) ज्ञानबा-तुकाराम... पांडुरंग हरी... विठ्ठल विठ्ठल जय हरी विठ्ठल... माऊली... माऊली... या अखंड हरिनामाच्या गजराने, टाळ-मृदंगाच्या मंगल निनादाने आणि विठ्ठलभक्तांच्या उत्स्फूर्त सहभागाने कडा नगरी बुधवारी भक्तीरसात न्हाऊन निघाली. आषाढी वारीच्या अखंड परंपरेचे जतन करणाऱ्या श्री संत मदन महाराज देवस्थान, कडा यांच्या पायी दिंडीचे पंढरपूरकडे अत्यंत उत्साहपूर्ण, भक्तीमय आणि मंगल वातावरणात प्रस्थान झाले. विठ्ठल दर्शनाची ओढ, मुखी हरिनाम आणि हृदयात पांडुरंग भेटीची आस अशा भक्तिभावाने भारलेल्या वातावरणात दिंडी मार्गस्थ झाली.

दिंडी प्रस्थानापूर्वी श्री संत मदन महाराज मठासमोर पालखी रथाची विधिवत पूजा, आरती आणि अभिषेक देवस्थानचे अध्यक्ष ह.भ.प. बबन महाराज बहिरवाल यांच्या हस्ते संपन्न झाला. मंत्रोच्चार, हरिनामाचा जयघोष आणि विठ्ठलाच्या नामस्मरणात रथाला पुष्पहार अर्पण करून वारीचा शुभारंभ करण्यात आला. त्यानंतर गावातील प्रमुख मार्गावरून पालखी रथाची भव्य मिरवणूक काढण्यात आली. घराघरांतून महिलांनी रांगोळ्या काढून, औक्षण करून व फुलांची उधळण करत दिंडीचे स्वागत केले. भगव्या पताका, टाळ-मृदंगाचा नाद आणि विठ्ठलनामाच्या गजराने संपूर्ण कडा नगरी भक्तिमय झाली होती.



यंदा पावसाने ओढ दिल्याने शेतकरी चिंतेत असले तरी, राज्यात भरघोस पाऊस पडावा, शेतकऱ्यांच्या जीवनात सुख-समृद्धी नांदावी आणि सर्वांचे कल्याण व्हावे, अशी प्रार्थना करण्यासाठी मोठ्या संख्येने वारकरी दिंडीत सहभागी झाले. वारी ही भक्ती, समता, सेवा आणि संस्कारांचा महामेळा असल्याचा प्रत्यय या सोहळ्यात प्रत्येक क्षणी अनुभवायला मिळाला.

प्रतीवर्षाप्रमाणे कडा कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती रमजान तांबोळी व बबलुशेठ तांबोळी यांच्या वतीने संपूर्ण दिंडीतील वारकऱ्यांसाठी नाश्त्याची व्यवस्था करण्यात आली. यावेळी ह.भ.प. बबन महाराज बहिरवाल यांचा सन्मानही करण्यात आला.

दिंडीला शुभेच्छा देण्यासाठी कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती रमजान तांबोळी, सरपंच युवराज पाटील, उपसरपंच दीपक कर्डिले, हेमंत पोखरणा, माजी सभापती संजय ढोबळे, राजाबापू कर्डिले, बाळासाहेब कर्डिले, ग्रामपंचायतीचे सदस्य, माजी शिक्षणाधिकारी विक्रम पोकळे, पत्रकार उत्तम बोडखे, रघुनाथ कर्डिले, राजेश राऊत, दिगंबर बोडखे, राजेंद्र तांगडे, सुभाष मामा सोनवणे, माजी सरपंच रामशेठ मधुरकर, अनिल तात्या ढोबळे, प्रा. डॉ. श्याम सांगळे, बंडू शिंदे, ह.भ.प. दादा महाराज चांगुणे, संतोष महाराज मोरे, भाऊसाहेब भोजने, रमेश भोजने, विकास धर्माधिकारी, लक्ष्मण कर्डिले, छगन कर्डिले, संपत कर्डिले, पांडुरंग कर्डिले, योगेश भंडारी, गोरख कर्डिले, सुरेश कर्डिले, बजरंग कर्डिले, राजू शिंदे यांच्यासह ग्रामस्थ, महिला, युवक आणि वारकरी भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

वारकऱ्यांसाठी मोफत आरोग्य तपासणी शिबिर

दिंडी प्रस्थानाच्या पवित्र प्रसंगी वारकरी व भाविकांच्या आरोग्याची काळजी घेत वारकरी सेवा मोफत आरोग्य तपासणी व औषधोपचार शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिरात प्रसिद्ध वैद्यकीय अधिकारी डॉ. सत्यजित विधाते आणि डॉ. सौ. शिवानी विधाते (बोडखे) यांच्यासह आरोग्य कर्मचाऱ्यांनी शेकडो वारकऱ्यांची आरोग्य तपासणी केली. पावसाळ्यातील पायी प्रवासाचा विचार करून वारकऱ्यांना प्रथमोपचार, आवश्यक वैद्यकीय तपासणी तसेच मोफत औषधांचे वाटप करण्यात आले. या सेवाभावी उपक्रमाचे देवस्थान समिती व नागरिकांकडून विशेष कौतुक करण्यात आले.

वारी ही केवळ पायी चालण्याची परंपरा नसून सेवा, समर्पण आणि सहकार्याची संस्कृती असल्याचे दर्शन यावेळी घडले. शेरी बु. येथे पांडुरंग नाथ यांच्या वतीने दिंडीतील वारकऱ्यांसाठी महाप्रसाद व भोजनाची प्रेमपूर्वक व्यवस्था करण्यात आली. टाळ, मृदंग, वीणेचा नाद, भगव्या पताका, तुळशीच्या माळा, कपाळावरील गोपीचंदन आणि मुखी अखंड विठ्ठलनाम अशा भक्तिमय वातावरणात मार्गक्रमण करत ही पायी दिंडी दि. २३ जुलै रोजी श्रीक्षेत्र पंढरपूर येथे पोहोचणार असून, विठुरायाच्या चरणी नतमस्तक होत समाजाच्या सुख-समृद्धीसाठी, चांगल्या पावसासाठी आणि सर्वांच्या कल्याणासाठी प्रार्थना करणार आहे.

# स्वराज्यासाठी प्राणार्पण करणाऱ्या वीरांना मानाचा मुजरा

## भोकरदनमध्ये नरवीर बाजीप्रभू व फुलाजी देशपांडे यांची पुण्यतिथी भावपूर्ण वातावरणात

पावनखिंडीचा इतिहास तरुणांसाठी प्रेरणादायी किरण देशपांडे

भोकरदन इसरारखान पठाण :- स्वराज्याच्या रक्षणासाठी पावनखिंडीत प्राणांची आहुती देत पराक्रमाची अमर गाथा लिहिणारे नरवीर बाजीप्रभू देशपांडे आणि त्यांचे बंधू फुलाजी देशपांडे यांच्या पुण्यतिथीनिमित्त भोकरदन शहरात सोमवारी दि.१३ ऐतिहासिक गणपती मंदिर संस्थान, गणपती गल्ली येथे भावपूर्ण अभिवादन करण्यात आले. शिवप्रेमींच्या उत्स्फूर्त उपस्थितीत झालेल्या या कार्यक्रमात स्वराज्यासाठी बलिदान देणाऱ्या वीरांना कृतज्ञतेने स्मरण करण्यात आले.कार्यक्रमाची सुरुवात नरवीर बाजीप्रभू देशपांडे यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पहार अर्पण करून झाली. फुलांनी सजविलेल्या प्रतिमेसमोर उपस्थित शिवभक्तांनी श्रद्धेने नतमस्तक होत स्वराज्याच्या या दोन महान योद्ध्यांना आदरांजली वाहिली.यावेळी मार्गदर्शन करताना



किरण मधुकरराव देशपांडे म्हणाले घोडखिंड आपल्या रक्ताने पावन करून तिला पावनखिंड म्हणून इतिहासात अजरामर करणारे बाजीप्रभू देशपांडे हे स्वराज्यनिष्ठा, पराक्रम आणि त्यागाचे सर्वोच्च प्रतीक आहेत. त्यांचे शौर्य कर्तव्यनिष्ठा आणि राष्ट्रभक्ती आजच्या तरुण पिढीसाठी प्रेरणादायी असून स्वराज्यासाठी केलेले त्यांचे बलिदान प्रत्येकाने स्मरणात ठेवण्याची गरज आहे.

कार्यक्रमाला शहरातील शिवप्रेमी नागरिक तसेच गणपती मंदिर संस्थानचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. हर हर महादेव आणि छत्रपती शिवाजी महाराज की जय च्या घोषणांनी परिसर दुमदुमून गेला.शेवटी उपस्थितांनी स्वराज्यासाठी प्राणार्पण करणाऱ्या सर्व वीरांना सामूहिक श्रद्धांजली अर्पण करून कार्यक्रमाची सांगता केली. पुण्यतिथीच्या निमित्ताने स्वराज्याच्या इतिहासाचे स्मरण करत नव्या पिढीने राष्ट्रप्रेम त्याग आणि कर्तव्यनिष्ठेची प्रेरणा घ्यावी असा संदेश यावेळी देण्यात आला.



## वादळी वाऱ्याचा तडाखा शेतातील सोलर पॅनेलचे मोठे नुकसान शेतकरी अडचणीत

घनसावंगी प्रतिनिधी :- घनसावंगी तालुक्यातील वडीरामसगाव येथील शेतकरी मीरा घुले व महेश्वर घुले यांच्या शेतातील जी.के.कंपनीचे सौरऊर्जा प्रकल्प सोलर पॅनेल वादळी वाऱ्याच्या तडाख्यात मोठ्या प्रमाणावर नुकसानग्रस्त झाले.जोरदार वाऱ्यामुळे अनेक सोलर पॅनेल कोसळले असून लोखंडी स्ट्रक्चरचेही मोठे नुकसान झाले आहे.या घटनेमुळे सौरपंप बंद पडल्याने शेतातील पिकांना पाणीपुरवठा करण्यास अडचणी निर्माण झाल्या आहेत.त्यामुळे शेतकऱ्यांसमोर मोठे संकट उभे राहिले आहे.संबंधित जी. के. कंपनीने तातडीने घटनास्थळी पाहणी करून पंचनामा करावा व नुकसानभरपाई देऊन सौरयंत्रणा पूर्ववत सुरू करून द्यावी अशी मागणी शेतकरी मीरा घुले व महेश्वर घुले यांनी केली आहे.

## ढोकसाळ स्मशानभूमीवरून वाद पेटला अंत्ययात्रा अडवून

# जातीय शिवीगाळ जीवे मारण्याच्या धमक्या कारवाईसाठी प्रशासनाला साकडे

जालना शेख फारुक :

बदनापूर तालुक्यातील ढोकसाळ येथे बौद्ध समाजाच्या आरक्षित स्मशानभूमीवरून वाद निर्माण झाला असून अंत्ययात्रा अडविणे जातीय शिवीगाळ करणे मारहाणीचा प्रयत्न तसेच जीवे मारण्याच्या धमक्या दिल्याचा आरोप करण्यात आला आहे.या प्रकरणी पवन श्रीरंग मांडळे यांनी जिल्हाधिकारी,जिल्हा पोलिस अधीक्षक, उपविभागीय अधिकारी, उपविभागीय पोलिस अधिकारी,तहसीलदार आणि पोलिस निरीक्षक यांच्याकडे लेखी तक्रार देत तातडीने कठोर कारवाईची मागणी केली आहे.तक्रारीनुसार ६ जुलै २०२६ रोजी अर्जदाराचे वडील श्रीरंग भागुजी मांडळे यांच्या निधनानंतर त्यांची अंत्ययात्रा समाजाच्या पारंपरिक स्मशानभूमीकडे जात असताना काही व्यक्तींनी अंत्यसंस्कारास विरोध करत अंत्ययात्रा अडविली. यावेळी समाजबांधवांना जातीय शिवीगाळ करण्यात आली तसेच मारहाणीचाही प्रयत्न झाल्याचा आरोप करण्यात आला आहे.अर्जात नमूद केल्याप्रमाणे गट क्रमांक ९२ मधील ३५ गुंठे जागेपैकी



१० गुंठे बौद्ध समाजाच्या स्मशानभूमीसाठी १५ गुंठे मुस्लिम कब्रस्तानासाठी आणि १० गुंठे ख्रिश्चन स्मशानभूमीसाठी शासनाने आरक्षित ठेवले असून त्याची नोंद फेरफार क्रमांक ४०१ मध्ये आहे. मात्र बौद्ध समाजासाठी राखीव जागेवर अतिक्रमण करून पिठाची गिरणी व किराणा दुकान उभारण्यात आल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे.वडिलांच्या अंत्यसंस्कारानंतर पोलिसांकडे तक्रार केल्यास संपूर्ण कुटुंब संपविण्याच्या आणि जीवे मारण्याच्या धमक्या देण्यात आल्याचा दावाही अर्जदाराने केला आहे. त्यामुळे संबंधितांविरुद्ध अनुसूचित जाती-जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्यानुसार गुन्हा दाखल करून तातडीने अटक करावी स्मशानभूमी अतिक्रमणमुक्त करून समाजाच्या ताब्यात द्यावी आणि कायमस्वरूपी पोलिस संरक्षण द्यावे अशी मागणी करण्यात आली आहे.

दरम्यान प्रशासनाने तातडीने आणि निष्पक्ष कारवाई न केल्यास समाजबांधवांसह जिल्हाधिकारी कार्यालयासमोर तीव्र आंदोलन छेडण्यात येईल असा इशारा पवन श्रीरंग मांडळे यांनी दिला आहे.

# पंढरपुरात माजी नगराध्यक्ष भास्करराव अंबेकर यांचे श्रीविठ्ठल-रुक्मिणी दर्शन राज्यात भरपूर पावसासाठी साकडे



जालना शेख फारुक :-

आषाढी एकादशीच्या भक्तिमय वातावरणात जालना शहराचे माजी नगराध्यक्ष भास्करराव अंबेकर यांनी पत्नी सौ. शोभाताई अंबेकर व कन्या नेहा अंबेकर यांच्यासमवेत पंढरपूर येथे श्रीविठ्ठल-रुक्मिणीचे दर्शन घेऊन विधिवत पूजा-अर्चा केली. यावेळी त्यांनी राज्यातील शेतकरी सर्वसामान्य नागरिक तसेच मुक्या जनावरांच्या सुख-समृद्धीसाठी श्री विठ्ठल-रुक्मिणी चरणी मनोभावे प्रार्थना केली.

मागील पंधरा दिवसांपासून राज्यातील अनेक भागांत समाधानकारक पाऊस न झाल्याने शेतकरी चिंतेत आहे. पावसाअभावी पिकांसह जनावरांसमोरही अडचणी निर्माण होण्याची शक्यता लक्षात घेऊन अंबेकर यांनी राज्यात भरपूर व समाधानकारक पाऊस पडू दे शेतकऱ्यांची पिके बहरून येऊ दे आणि सर्व जनता सुखी समृद्ध व निरोगी राहू दे अशी भावपूर्ण प्रार्थना श्री विठ्ठल-रुक्मिणी चरणी अर्पण केली.आषाढी वारीच्या पावन वातावरणात केलेल्या या प्रार्थनेमुळे राज्यातील बळीराजाच्या शिवारात हिरवाई नांदावी आणि सर्वांच्या जीवनात आनंद व समृद्धी यावी अशी भावना त्यांनी व्यक्त केली.



# खा.संदिपान मामा भुमरे यांना शिवसेनेकडून वाढदिवसाच्या शुभेच्छा

## जिल्हाप्रमुख भाऊसाहेब घुगे संतोष ताठे व राजेश कोल्हे यांची सदिच्छा भेट

जालना प्रतिनिधी :-

महाराष्ट्र राज्याचे माजी मंत्री छत्रपती संभाजीनगर जिल्ह्याचे खासदार जालना लोकसभा मतदारसंघाचे शिवसेना संपर्कप्रमुख मा. संदिपान मामा भुमरे यांच्या वाढदिवसानिमित्त शिवसेनेच्या वतीने त्यांची सदिच्छा भेट घेऊन वाढदिवसाच्या शुभेच्छा देण्यात आल्या. यावेळी शिवसेनेचे जिल्हाप्रमुख भाऊसाहेब घुगे, संतोष ताठे आणि राजेश कोल्हे यांनी खासदार भुमरे यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला. त्यांच्या निरोगी, दीर्घायुषी आणि यशस्वी सार्वजनिक जीवनासाठी शुभेच्छा व्यक्त करण्यात आल्या.यावेळी विविध सामाजिक विकासात्मक तसेच संघटनात्मक विषयांवरही चर्चा झाली. शिवसेना संघटना अधिक बळकट करण्यासाठी कार्यकर्त्यांनी एकजुटीने काम करण्याचे आवाहन खासदार संदिपान मामा भुमरे यांनी केले. या प्रसंगी उपस्थित पदाधिकारी व कार्यकर्त्यांनीही त्यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देत आगामी वाटचालीसाठी सदिच्छा व्यक्त केल्या.

# ज्ञानेश्वर वाकडे हत्या प्रकरण

## सहावा आरोपी जेरबंद, चौघांना पाच दिवसांची पोलीस कोठडी

अंबाजोगाई(प्रतिनिधी)

ज्ञानेश्वर वाकडे यांच्या हत्या प्रकरणात तपासाची चक्रे वेगाने फिरवत पोलिसांनी सहावा आरोपी विशाल शिंदे याला सोमवारी बेड्या ठोकल्या. यापूर्वी अटक करण्यात आलेल्या केरबा कांबळे, सुरज ताटे, कन्हैया मिसाळ आणि गणेश खंदारे या चार आरोपींना सोमवारी न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने त्यांना पाच दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे.

या गुन्ह्यातील आरोपी गोकुळ इचके हा पोलिसांच्या तावडीतून पलायन करण्याच्या प्रयत्नात भिंतीवरून पडून गंभीर जखमी झाला. त्याच्यावर सध्या पोलिसांच्या कडक निगराणीखाली स्वामी रामानंद तीर्थ रुग्णालयात उपचार सुरू आहेत. रुग्णालयातून सुट्टी मिळताच त्याला रीतसर अटक केली जाईल. नुकताच जेरबंद झालेला आरोपी विशाल शिंदे याला लवकरच न्यायालयात हजर केले जाणार आहे. या प्रकरणातील एकमेव आरोपी समाधान मिसाळ हा अद्याप फरार असून पोलीस त्याच्या मागावर आहेत.ज्ञानेश्वर वाकडे यांच्या हत्या प्रकरणात तपासाची चक्रे वेगाने फिरवत पोलिसांनी सहावा आरोपी विशाल शिंदे याला सोमवारी बेड्या ठोकल्या. यापूर्वी अटक करण्यात आलेल्या केरबा कांबळे, सुरज ताटे, कन्हैया मिसाळ आणि गणेश खंदारे या चार आरोपींना सोमवारी न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने त्यांना पाच दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे.

# जनदूत पत्रकार संघाच्या मागणीला यश; १५ ऑगस्टला उत्कृष्ट बीएलओंचा जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते होणार गौरव

छत्रपती संभाजीनगर / प्रतिनिधी

निवडणूक प्रक्रियेत महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या बूथ लेव्हल ऑफिसर (बीएलओ) यांच्या कार्याचा सन्मान व्हावा, या जनदूत पत्रकार संघाच्या मागणीला यश आले आहे. स्वातंत्र्यदिनानिमित्त १५ ऑगस्ट रोजी आयोजित मुख्य शासकीय ध्वजारोहण सोहळ्यात उत्कृष्ट कार्य करणाऱ्या बीएलओंचा जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते सत्कार करण्यात येणार आहे.

मतदार नोंदणी, मतदार याद्यांचे पुनरीक्षण, नवीन मतदारांची नोंद, मतदार ओळखपत्राशी संबंधित विविध कामे तसेच निवडणुकीच्या काळात जबाबदारीने कर्तव्य पार पाडणाऱ्या बीएलओंची भूमिका अत्यंत महत्त्वाची असते. मात्र, त्यांच्या कार्याचा अपेक्षित सन्मान होत नसल्याची बाब लक्षात घेऊन जनदूत पत्रकार संघाने जिल्हा प्रशासनाकडे उत्कृष्ट बीएलओंचा स्वातंत्र्यदिनी गौरव करण्याची मागणी केली होती.

या मागणीची दखल घेत जिल्हा प्रशासनाने सकारात्मक निर्णय घेतल्याने बीएलओंमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे. या निर्णयामुळे तळागाळात काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या कार्याला योग्य प्रोत्साहन मिळणार असून,




भविष्यात अधिक जबाबदारीने व गुणवत्तापूर्ण सेवा देण्यासाठी त्यांना प्रेरणा मिळेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

जनदूत पत्रकार संघाचे संस्थापक अध्यक्ष दादासाहेब काळे व संपूर्ण शिष्टमंडळाने या निर्णयाबद्दल जिल्हाधिकारी व जिल्हा प्रशासनाचे आभार मानले असून, प्रशासनाने अशाच प्रकारे उत्कृष्ट कार्य करणाऱ्या विविध विभागातील कर्मचाऱ्यांचाही वेळोवेळी गौरव करावा, अशी अपेक्षाही व्यक्त करण्यात आली आहे.

# विमुक्त-भटक्या समाजाच्या संघटनात्मक चळवळीला बळ; बाबूराव केंद्रे यांचा सत्कार



किनवट । प्रतिनिधी

विमुक्त, घुमंतू जनजाती विकास परिषद (अखिल भारतीय)च्या महाराष्ट्र प्रदेश कार्यकारिणीत बाबूराव (तुळशीराम) केंद्रे यांची सहकार्यवाहपदी निवड झाल्याबद्दल त्यांचा जाहीर सत्कार करण्यात आला. या सत्कार समारंभाला प्रमुख उपस्थितीत आमदार भीमराव केराम होते. यावेळी भाजप जिल्हाध्यक्ष ड. किशोर देशमुख, मंडळ अध्यक्ष बालाजी आलेवार, स्वागत आयनेनिवार, ड. नैतिक नाईक यांच्यासह विविध सामाजिक, राजकीय क्षेत्रातील मान्यवर, कार्यकर्ते आणि समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी उपस्थित मान्यवरांनी बाबूराव केंद्रे यांचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करत त्यांच्या पुढील सामाजिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या. महाराष्ट्र प्रदेश कार्यकारिणीत मिळालेली जबाबदारी ही किनवटसह नांदेड जिल्ह्यासाठी अभिमानाची बाब असल्याचे मत उपस्थितांनी व्यक्त केले. यावेळी आमदार भीमराव केराम यांनी बाबूराव केंद्रे यांनी अनेक वर्षांपासून विमुक्त, भटके व घुमंतू समाजाच्या प्रश्नांसाठी केलेल्या कार्याचा गौरव करत, नव्या जबाबदारीतून समाजाच्या न्याय्य मागण्या शासनापर्यंत प्रभावीपणे पोहोचवाव्यात, असा विश्वास व्यक्त केला. सत्काराला उपस्थित मान्यवरांनीही बाबूराव केंद्रे यांच्या निवडीचे स्वागत करत, त्यांच्या नेतृत्वाखाली समाज संघटन अधिक मजबूत होईल आणि विमुक्त-भटक्या समाजाच्या प्रश्नांच्या सोडवणुकीला नवे बळ मिळेल, असा विश्वास व्यक्त केला. कार्यक्रमास विविध सामाजिक संघटनांचे पदाधिकारी, कार्यकर्ते व समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# जुना कौठा नरोबा मंदिर येथे आयोजित एसआयआर गणना पत्र मोहीमेला नागरीकांच्या उत्स्फूर्त प्रतिसाद



नवीन नांदेड - महसूल ,मनपा प्रशासन यांच्या वतीने व मनपा प्रभाग क्रमांक १९ नगरसेवक यांच्या सहकार्याने आयोजित एस आय आर मोहीम अंतर्गत १५ जुलै रोजी आयोजित कॅम्पला जुना कौठा नांदेड येथील विविध भागातील बुथ वाईज मतदारांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला यावेळी मनपा आयुक्त डॉ.महेश कुमार डोईफोडे,उपविभागीय अधिकारी डॉ.सचिन खल्लाळ, तहसीलदार संजय वारकड यांनी भेट देऊन प्रशंसा केली.

१५ जुलै रोजी आयोजित एस आय आर मोहीमे अंतर्गत गनना पत्र नोंदणी अभियानाचे आयोजन नगरसेवक प्रतिनिधी गणेश काकडे ,विनोद काकडे आणि राजू पाटील काळे यांच्या पुढाकाराने नरोबा मंदिर (कौठा) परिसरात नुकतेच 'एस आय आर शिबिर'चे आयोजन करण्यात आले होते.

या उपक्रमाला नागरिकांकडून मोठा प्रतिसाद मिळाला असून, सकाळ पासूनच लोकांनी शिबिराच्या ठिकाणी मोठी गर्दी केली होती. अनेक नागरिकांनी प्रत्यक्ष उपस्थित राहून या सुविधेचा लाभ घेत आपले फॉर्म भरून घेतले.या शिबीराला मनपा आयुक्त डॉ.महेश कुमार डोईफोडे, उपायुक्त गढवे, उपविभागीय अधिकारी डॉ.सचिन खल्लाळ, तहसीलदार संजय वारकड,मनपा सिडको सह आयुक्त डॉ मिर्झा बेग, यांनी भेट देऊन पाहणी करून बुथ वाईज बिलओ यांच्या सह मतदार नोंदणी साठी टेबल व्यवस्था केल्या बदल नगरसेवक प्रतिनिधी यांच्यी प्रशंसा करून अभिनंदन केले,यावेळी उपस्थित मान्यवरांचे स्वागत नगरसेवक प्रतिनिधी राजूपाटील काळे,गणेश काकडे,विनोद काकडे यांनी केले.

निवडणूक अधिकारी अविनाश शिनगारे बिएलओ म्हणून बकवाड,वाखडकर,वलसे,भोकरे,वानखेडे,नव्हारे यांच्या सह तलाठी श्रीरामे,वसुली लिपिक मारोती सारंग ,मोहन आसुरे यांनी सहकार्य केले. लोक प्रतिनिधींच्या या जनहिताच्या उपक्रमाचे नागरिकांमधून समाधान व्यक्त केले जात आहे.





# नांदेड जिल्हा पोलीस दलांचे नाव जागतिक पातळीवर पोहचवणारे

अर्धापूर पोलीस स्टेशन येथे कार्यरत अंमलदार चंद्रकांत पुलकुटवार . नांदेड जिल्हा प्रतिनिधी नांदेड जिल्हा पोलीस दलांचे नाव जागतिक पातळीवर पोहचवणारे अर्धापूर पोलीस स्टेशन येथे कार्यरत अंमलदार चंद्रकांत पुलकुटवार . यांनी जागतिक शालेय व्हॉलीबॉल क्रिडा स्पर्धा शियागुंल चायना यशस्वी पंच म्हणून उत्कृष्ट कामगिरी केल्याबद्दल पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी ऊमाप व जिल्हा पोलीस अधीक्षक निलभ रोहन यांनी सत्कार करून शुभेच्छा दिल्या.जागतिक शालेय व्हॉलीबॉल क्रीडा स्पर्धा २०२६ शियांगलू चायना येथे दिनांक १ जुलै ते १० जुलै दरम्यान पार पडल्या स्पर्धेत भारतातून व्हॉलीबॉल फेडरेशन ऑफ इंडिया यांचेकडून महाराष्ट्र व्हॉलीबॉल असोशियन कडे दोन पंचाची मागणी केली होती त्यामध्ये नांदेड येथील पोलीस स्टेशन अर्धापूर येथील अमलदार चंद्रकांत पुलकुटवार व सौरभ रोकडे नागपूर यांची निवड झाली होती स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी करून भारतात परत आल्यावर पोलीस उप महानिरीक्षक शहाजी उमाप यांनी सत्कार करून शुभेच्छा दिल्या.

# निपुण भारत अभियानाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी नियोजनबद्ध काम करा : जिल्हाधिकारी राहुल कर्डिले



एआय तंत्रज्ञानाचा शिक्षणात अधिकाधिक वापर करण्यावर भर

नांदेड जिल्हा प्रतिनिधी निपुण भारत अभियानाची प्रभावी अंमलबजावणी, जिल्ह्यातील शैक्षणिक गुणवत्ता उंचावणे आणि परफॉर्मन्स ग्रेडिंग इंडेक्स (झग्रख) मध्ये नांदेड जिल्ह्याला राज्यात अग्रस्थानी आणण्यासाठी नियोजनबद्ध पद्धतीने काम करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी दिले. बदलत्या काळात कृत्रिम बुद्धिमत्ता (-ख) तंत्रज्ञानाचा शिक्षण प्रक्रियेत प्रभावी वापर करून शिक्षक व विद्यार्थ्यांना तंत्रस्नेही बनविण्यावर भर द्यावा असेही त्यांनी सांगितले.

जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन भवन येथे १४ जुलै रोजी शिक्षण विभागाच्या निपुण भारत अभियानाच्या आढावा बैठकीत ते अध्यक्षस्थानावरून बोलत होते.

यावेळी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी महेश पाटील, विभागीय शिक्षण उपसंचालक दीपक चवणे, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था (ऊखएढ) चे प्राचार्य अमोल निळेकर, माध्यमिक शिक्षणाधिकारी माधव सलगर, प्राथमिक शिक्षणाधिकारी वंदना फुटाणे, डायटचे अधिव्याख्याते, जिल्ह्यातील गटशिक्षणाधिकारी, शिक्षण विस्तार अधिकारी व केंद्रप्रमुख उपस्थित होते.

प्रास्ताविक प्राथमिक शिक्षणाधिकारी वंदना फुटाणे यांनी केले. यावेळी जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेच्या वतीने अधिव्याख्याता शिवाजी साखरे यांनी 'निपुण भारत' विषयावर सादरीकरण केले. तसेच शाळा भेटी व परफॉर्मन्स ग्रेडिंग इंडेक्स (झग्रख) संदर्भात ज्येष्ठ अधिव्याख्याता बालाजी शेळके आणि अधिव्याख्याता डॉ. किरण रापतवार यांनी सादरीकरण केले.

मार्गदर्शन करताना जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी जिल्ह्यातील शैक्षणिक गुणवत्ता उंचावण्यासाठी तंत्रज्ञानाधारित अध्यापनावर भर देण्याच्या सूचना दिल्या. विद्यार्थ्यांना तंत्रशिक्षणाच्या माध्यमातून स्वयंपूर्ण बनविण्यासाठी कृती आराखडा तयार करण्याचे निर्देश त्यांनी शिक्षण विभागाला दिले.

मुख्य कार्यकारी अधिकारी महेश पाटील यांनी जिल्हा परिषद शाळांमधील शैक्षणिक गुणवत्ता व भौतिक सुविधांमध्ये सुधारणा करण्यासाठी प्रभावी उपाययोजना राबविण्याचे आवाहन केले. तसेच शिक्षकांच्या गरजांनुसार प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करण्याबाबत जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेला सूचना दिल्या.विभागीय शिक्षण उपसंचालक दीपक चवणे यांनी निपुण भारत अभियानातील उद्दिष्टपूर्तीसाठी तसेच पीजीआयमधील सर्व मानके व उपमानकांमध्ये अपेक्षित गुणप्राप्तीसाठी शाळांनी नियोजनपूर्वक काम करण्याचे मार्गदर्शन केले.बैठकीचे सूत्रसंचालन प्रलोभ कुलकर्णी यांनी केले, तर उपस्थितांचे आभार श्रीकांत थगनारे यांनी मानले.

# बोगस सोयाबीन कंपन्यावर कारवाई करून शेतकऱ्यांना नुकसान भरपाई द्या

## अ.भा.भ्र.समितीची मुख्यमंत्र्याकडे मागणी



बिलोली प्रतिनिधी

सोयाबिनच्या विविध नामांकीत कंपन्यानी बाजारात विक्रीसाठी पुरवठा केलेले निकृष्ट दर्जाहीन बोगस बियाणे पेरणी केल्यामुळे बिलोली तालुक्यातील अनेक शेतकऱ्यांना मोठा जबर फटका बसला आसुन पेरलेले ते सोयाबीन बियाणे उगवलेच नसल्यामुळे अनेक शेतक-यावर दुबारा.. तिबारा पेरणीचे मोठे संकट उभारले आसुन शेतकऱ्यांची फसवणुक करणा-या त्या बोगस सोयाबीन कंपन्यावर कार्यवाही करावी व हवालदील शेतकऱ्यांना नुकसान भरपाई द्यावी अन्यथा अ.भा.भ्र.समितीच्या वतिने अंदोलन छेडण्यात येईल आशा ईशा-याचे निवेदन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे तहसिलदार यांच्या मार्फत देण्यात आले आहे .

शेतक-यांना या ना त्या आशा विविध कारणामुळे सतत नैसर्गिक प्रकोपाचा अत्यंत गंभीर सामना करावा लागत आसताना दुस-या बाजुने बाजारात विविध जातीच्या बियाणे कंपन्याचा वाढलेला सुळसुळाट यावर संबंधीत यंत्रणेचे अंकुश नसल्या कारणाने बियाणे व रासायनिक खत तसेच विविध किटक नाशक औषधी कंपन्याकडुन मनमानी दर लादुन शेतकऱ्यांची अर्थिक लुट केली जात आहे.पिक उत्पादन वाढीच्या अपेक्षा बाळगुन घरातील दाग-दागिने विकुन, जमेल त्या पध्दतीने कर्ज काढून बाजारात उपलब्ध आसलेली नामांकीत कंपनीचे महागड्या दराची सोयाबीनची बियाणे व रासायनिक खते विकत घेऊन यंदाची खरीपाची कसीबशी शेतक-यांनी पेरणी केले. परंतु पेरलेले ते सोयाबीन बियाणे उगवलेच नसल्याने या निकृष्ट दर्जाच्या कमकुवत बोगस बियाणामुळे बिलोली तालुक्यासह जिल्ह्यातील शेतक-यांची मोठी फसवणुक झाली आसुन या बोगस बियाणामुळे शेतकऱ्यांवर दुबारा..तिबारा पेरणीचे मोठे अर्थिक संकट ओढावले आसुन या संदर्भात तात्काळ चौकशी समितीची नेमणुक करून दरवर्षी बोगस बियाणे विक्री करुन शेतक-यांची वारंवार फसवणुक करणाऱ्या बोगस कंपन्यावर कडक कार्यवाही करावी व संबंधीत जबाबदार कृषी विभागाचे अधिकारी तसेच बोगस बियाणे विक्री करणाऱ्या कृषी केंद्र चालकावर कार्यवाही करावी. व त्या अन्यायग्रस्त शेतकऱ्यांना तात्काळ नुकसान भरपाई द्यावी अन्यथा अखिल भारतीय भ्रष्टाचार निर्मुलन संघर्ष समितीच्या वतीने दि.२१ जुलै २०२६ रोजी तालुका कृषी कार्यालय बिलोली समोर विविध मार्गाने अंदोलन करण्याचा ईशारा एका निवेदनाद्वारे तहसिलदार गजानन शिंदे यांच्या मार्फत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे समितीचे राष्ट्रीय सरचिटणीस राजु पाटील शिंपाळकर जिल्हाध्यक्ष शंकरराव मावलगे, बाबुराव कदम,सय्यद रियाज,संभाजी नरवाडे,अनिल पा. नरवाडे, आत्माराम पाटिल, ईश्वर जाहुरे, परमेश्वर वाघमारे तुकाराम नरवाडे यानी दि. १४ जुलै रोजी निवेदनाद्वारे मागणी केली आहे

# एसआयआर कार्यक्रमांतर्गत सर्व पात्र मतदारांनी गणना पत्रक (ईएफ फॉर्म) भरून द्यावेत- जिल्हाधिकारी राहुल कर्डिले

नांदेड जिल्हा प्रतिनिधी भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार विशेष संक्षिप्त पुनरीक्षण कार्यक्रमांतर्गत नांदेड जिल्ह्यात मतदान केंद्रस्तरीय अधिकारी यांच्या माध्यमातून एन्यूमरेशन फॉर्म (एफ) चे घरपोच वितरण, संकलन व डिजिटायझेशन करण्याचे काम युद्धपातळीवर सुरू आहे. जिल्ह्यातील प्रत्येक पात्र मतदाराने आपले नाव प्रारूप मतदार यादीत समाविष्ट होण्यासाठी ईएफ फॉर्म भरून संबंधित बीएलओकडे जमा करणे अनिवार्य आहे.

ईएफ फॉर्म भरून जमा न करणाऱ्या मतदारांचे नाव प्रारूप मतदार यादीत समाविष्ट होणार नाही. त्यामुळे प्रत्येक पात्र मतदाराने वेळेत गणनापत्रक भरून निवडणूक विभागास सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी राहुल कर्डिले यांनी केले आहे.

ज्या मतदारांची नावे चरर्शिव, णप-ारर्शिव व -पोरश्रळशी या प्रवर्गांमध्ये आहेत, त्या सर्व मतदारांनीदेखील ईएफ फॉर्म भरणे आवश्यक आहे. -पोरश्रळशी प्रवर्गातील मतदारांनी ईएफ फॉर्म भरून दिल्यास त्यांचे नाव प्रारूप मतदार यादीत समाविष्ट केले जाईल. त्यानंतर दावा व हरकतीच्या कालावधीत सुनावणीदरम्यान भारत निवडणूक आयोगाने निर्धारित केलेल्या ११ प्रकारच्या पुराव्यांपैकी आवश्यक पुरावे सादर केल्यानंतर पात्र मतदारांचे नाव अंतिम मतदार यादीत समाविष्ट करण्यात येईल.

एसआयआर-२०२६ मोहिमेला अधिक गती देण्यासाठी जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी स्वतः विविध विधानसभा मतदारसंघांमध्ये क्षेत्रीय भेटी देऊन ईएफ फॉर्मचे वितरण, संकलन व डिजिटायझेशनच्या कामाचा आढावा घेत आहेत. तसेच संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक सूचना देऊन कामाची गती वाढविण्यावर भर देत आहेत.

दरम्यान, महापालिका आयुक्त तथा अतिरिक्त निवडणूक अधिकारी यांनी ८६-नांदेड उत्तर व ८७-नांदेड दक्षिण विधानसभा मतदारसंघातील मतदार नोंदणी अधिकाऱ्यांनी नियुक्त केलेल्या सर्व सहाय्यक मतदार नोंदणी अधिकाऱ्यांची बैठक घेऊन महापालिकेचे क्षेत्रीय अधिकारी, बिल कलेक्टर तसेच इतर कर्मचाऱ्यांनी शहरी भागातील बीएलओंना आवश्यक सहकार्य करण्याच्या सूचना दिल्या आहेत. याशिवाय प्रत्यक्ष क्षेत्रीय भेटी देऊन कामाचा वेग वाढविण्यासाठी विशेष प्रयत्न सुरू आहेत.

दि. १५ जुलै २०२६ रोजी दुपारी १२ वाजेपर्यंतच्या अहवालानुसार नांदेड जिल्ह्यात एकूण २७,७७,०७३ मतदारांपैकी २०,६६,७७१ मतदारांना ईएफ फॉर्मचे वितरण पूर्ण झाले असून, ही टक्केवारी ७४.४२ इतकी आहे. तसेच १२,३९,६९७ ईएफ फॉर्मचे डिजिटायझेशन पूर्ण झाले असून त्याची टक्केवारी ४४.६४ आहे.

जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी जिल्ह्यातील सर्व मतदारांना आवाहन केले आहे की, आपल्या मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्याकडून (इङज) प्राप्त झालेला ईएफ फॉर्म तात्काळ भरून आवश्यक माहिती अचूकपणे सादर करावी. मतदार यादी अद्ययावत, अचूक व सर्वसमावेशक करण्यासाठी प्रत्येक मतदाराचे सहकार्य अत्यंत महत्त्वाचे आहे. त्यामुळे प्रत्येक पात्र मतदाराने वेळेत ईएफ फॉर्म भरून लोकशाहीच्या या महत्त्वपूर्ण प्रक्रियेत सक्रिय सहभाग नोंदवावा.

# जैन को ऑप हाउसिंग सोसायटी कौठा येथे मुलभूत सुविधा अंतर्गत सिमेंट कॉंक्रीट रस्त्यांचा कामाचा शुभारंभ



नवीन नांदेड - नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका प्रभाग क्रमांक १९ मधील मुलभूत सुविधा अंतर्गत असलेल्या निधीतून १कोटी ६० लक्ष रूपयाचा कामांचा शुभारंभ जैन को-ऑप हाऊसिंग सोसायटी येथे बॉम्ब शोध पथक ते जैन को ऑप सोसायटी पर्यंत सिमेंट कॉंक्रीटच्या रस्त्याच्या शुभारंभ माजी नगरसेवक राजू पाटील काळे, नगरसेवक प्रतिनिधी विनोद काकडे व पदाधिकारी यांच्या उपस्थितीत १४ जुलै रोजी करण्यात आला.

मनपा हद्दीतील नवीन कौठा भागातील प्रभाग क्रमांक १९ मधील गेल्या अनेक वर्षांपासून मुख्य रस्ता प्रलंबित होता तर पावसाळ्यात या भागात नागरीकाची व विध्यार्थी सह वाहनधारकांची गैरसोय होत गेली परिसरातील नागरिकांनी या गैरसोयी बदल माजी नगरसेवक राजू पाटील काळे यांच्या कडे केली होती अखेर या मुख्य रस्त्यासाठी मुलभूत सुविधा अंतर्गत १ कोटी ६० लक्ष रूपये निधी उपलब्ध झाला असून बॉम्ब शोध पथक ते जैन को.ऑप सोसायटी पर्यंत ४६१ लांबी व ७ मिटर रूंदी कामाचा शुभारंभ माजी नगरसेवक राजू पाटील काळे, नगरसेवक प्रतिनिधी विनोद काकडे यांच्या उपस्थितीत करण्यात आला, यावेळी अध्यक्ष विजय(मुन्ना) कासलीवाल,अमितकासलीवाल,उपनिरीक्षक संजय केंद्रें,सुनील काला,अनिल कासलीवाल, किशोर कासलीवाल, बाबूरावजी धूमाल ,गुत्तेदार शिंदे,मारुती भारती,प्रदीप बाबले,कामाजी आणि संजय जाधव यांच्या सह परिसरातील नागरिक उपस्थित होते.

# पोलीस भरती वयोमर्यादा ५ वर्षांनी वाढवावी तसेच MPSC परीक्षा ऑफलाईन घ्यावी

## राजे छत्रपती अकॅडमी चे संचालक ज्ञानेश्वर पाटील डूमणे यांची शासनाकडे मागणी,

मुखेड प्रातिनिधी:- राज्यातील पोलीस भरतीची तयारी करणाऱ्या लाखो युवक-युवतीचा भविष्याचा प्रश्न गंभीर बनला असून, पोलीस शिपाई सरळसेवा भरतीची वयोमर्यादा सरसकट ५ वर्षांनी वाढवावी तसेच चझडउ परीक्षा ऑफलाईन पद्धतीने घ्यावी, अशी मागणी राजे छत्रपती अकॅडमी, मुखेडचे संचालक तथा सैनिक फेडरेशनचे जिल्हाध्यक्ष ज्ञानेश्वर पाटील डूमणे यांनी केली आहे. यासंदर्भातील निवेदन मुखेड-कंधार मतदारसंघाचे आमदार डॉ. तुषार राठोड साहेब यांना भेटून सादर केले.

राज्याच्या कानाकोपऱ्यातून आलेले असंख्य पोलीस भरती उमेदवार २२ जून पासून मुंबईच्या आझाद मैदानावर लाखो तरुण-तरुणी वयोमर्यादा वाढीसाठी उपाशीपोटी आंदोलन करत असून, ऊन-पाऊस सहन करत न्यायाच्या आशेने शासनाकडे पाहत आहेत. त्यांच्या संघर्षाची दखल घेऊन शासनाने तातडीने सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली.

तसेच एम पी एस सी परीक्षा ऑफलाइन पद्धतीने घेण्याच्या मागणीसाठी छत्रपती संभाजीनगर येथे विद्यार्थ्यांनी विराट मोर्चा काढून शासनाचे लक्ष वेधले होते.ऑनलाइन परीक्षेमुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना तांत्रिक अडचणी व संगणक सुविधांच्या अभावाचा सामना करावा लागत असल्याने चझडउ परीक्षा ऑफलाईन घेणे अधिक पारदर्शक व विद्यार्थीहिताचे ठरेल, असेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

राज्यातील १५ ते १७ लाखांहून अधिक युवक-युवती अनेक वर्षांपासून पोलीस भरतीचे स्वप्न उराशी बाळगून कठोर परिश्रम घेत आहेत. मात्र विलंबामुळे हजारो उमेदवारांचे पोलीस दलात सेवा करण्याचे स्वप्न धोक्यात आले असून,

ग्रामीण भागातील शेतकरी, कष्टकरी आर्थिकदृष्ट्या दुर्बल असणाऱ्या कुटुंबातील तरुणांसाठी पोलीस भरती ही केवळ नोकरी नसून कुटुंबाचे भविष्य बदलण्याची एक संधी आहे. लाखो पोलीस भरती उमेदवार, स्पर्धा परीक्षार्थी आणि त्यांच्या कुटुंबीयांच्या भविष्याशी संबंधित हा अत्यंत संवेदनशील विषय असून शासनाने मानवी दृष्टिकोन ठेवून त्वरित सकारात्मक निर्णय घेऊन युवकांना न्याय द्यावा,,अशी भावनिक मागणी ज्ञानेश्वर डूमणे यांनी केली आहे.

दिनांक २२ जून २०२६ पासून मुंबईच्या आझाद मैदानावर पावसात विद्यार्थ्यांचे अखंड उपोषण तसेच६ जुलै२०२६ रोजी छत्रपती संभाजीनगर येथे लाखो विद्यार्थ्यांनी अथांग जनसागराचा विराट मोर्चा काढला असून त्यांना आमचा जाहीर पाठिंबा आहे असेही निवेदनात नमूद केलेले आहे.

मध्यप्रदेश, गुजरात आणि आसामप्रमाणे महाराष्ट्रातही पोलीस भरतीची वयोमर्यादा ५ वर्षांनी वाढवावी अशी मागणी करण्यात आली आहे.निवेदन स्वीकारल्यानंतर आमदार डॉ. तुषार राठोड, यांनी विषयाचे गांभीर्य लक्षात घेऊन आपल्या स्वीय सहाय्यक (पी.ए.) सुधीर चव्हाण यांना संबंधित निवेदनावर माननीय राज्याचे मुख्यमंत्री तथात गृहमंत्री यांना तात्काळ पत्रव्यवहार करण्यासाठी डॉ. तुषार राठोड यांनी आपल्या स्वीय सहाय्यक (पी.ए.) सुधीर चव्हाण यांना निर्देश दिले. तसेच पोलीस भरती वयोमर्यादा वाढ आणि चझडउ परीक्षा ऑफलाईन घेण्याबाबत शासनाकडे १०० टक्के पाठपुरावा करू, असे आश्वासन त्यांनी दिले.